गुरू म्हणणे अंधारातला दीप,
जो दाखवतो ज्ञानाचा मार्ग,
घडवतो व्यक्तिमत्त्व,
आणि उजळवतो भविष्य!"

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




"शिक्षक हेच समाजाचे खरे शिल्पकार आहेत."
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन


Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६६ | किंमत : २ रूपये


# महाराष्ट्राच्या उपराजधानीत डीजे बंदी झुगारली

## नागपूरच्या बडकस चौकात डीजेच्या दणदणाटात लेझरसह दहीहंडी उत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी डीजेवर १ नोव्हेंबरपर्यंत बंदी घातली होती. मात्र, हे आदेश धुडकावत नागपूरमध्ये डीजेचा दणदणाट सुरु असल्याचं समोर आलं आहे. दहीहंडी उत्सव नागपूरमध्ये सुरु आहे. पोलिसांच्या सूचनेनंतर ही ऊख वाजवत आणि लाइट्सचा वापर करत दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदाकडून थर रचणे सुरू झाले आहे. नागपूरच्या बडकस चौकात बडकस चौक मित्र परिवारतर्फे आयोजित दहीहंडीला सुरुवात झाली आहे. बडकस चौकात पोलीस



ही उपस्थित आहेत मात्र पोलीस आवाजाच्या मर्यादेवर लक्ष ठेवून होते.

नागपूरच्या बडकस चौकातील बडकस चौक मित्र परिवारानं सकाळपासून डीजे लावणार अशी भूमिका घेतली होती. संध्याकाळी दहीहंडीचा उत्सव सुरु झाला तेव्हा डीजे सुरु करण्यात आला आहे. डीजे लावण्यात आला असून आवाज नेहमीसारखा नाही. मात्र, काही अंशी कमी असला तरी डीजेचा दणदणाट सुरु आहे. तीव्र प्रकाशाच्या लाईटसचा वापर करण्यात आलेला आहे. बडकस चौकात गोविंदा पथकं थर रचून सहभाग नोंदवत आहेत. पोलीस देखील बडकस चौकात असून ते आवाज नोंदवत आहेत. सात वाजताच्या सुमारास आवाज ८० ते ८२ डेसिबल आवाजाची नोंद झाली आहे.

पोलीस याबाबत काय कारवाई करतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. डीजेचा वापर करुन बंदीचा आदेश झुगारुन लावल्याचं पाहायला मिळतंय.

### संदीप जोशींची डीजेवर बंदीची भूमिका

भाजपचे माजी आमदार संदीप जोशी यांनी डीजेवरील बंदी संदर्भातील भूमिका त्यांची वैयक्तिक असल्याचे म्हटलं. याचवेळी त्यांनी ती भूमिका लोकभावनेची, सर्वसामान्य रुग्णांची भूमिका आहे. ही सर्वसामान्य जनतेची भूमिका आहे. सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांची, सर्वसामान्य सर्वधर्मीय गर्भवती महिलांची, बच्चूंची भूमिका आहे, असं संदीप जोशी म्हणाले. मला अनेकांनी हमीपत्र देखील लिहून दिलेले आहे. जवळपास २० ते २५ मंडळ आहे की ज्यांनी हमीपत्र लिहून दिलेले आहे की ते म्हणतात आहे की आम्ही डीजेचा वापर करणार नाही, असे संदीप जोशी म्हणाले.

नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी डीजे बंदीचे आदेश दिले होते. यानंतर भाजपचे माजी आमदार संदीप जोशी डीजे बंदी केवळ दोन महिन्यांची नको ती कायमस्वरुपी असावी अशी मागणी केली होती. तर, भाजपचे आमदार प्रवीण दटके यांनी डीजे बंदी मागे घेण्याची मागणी केली आहे. हिंदूंच्या सणांच्या वेळीच डीजेवर बंदी का असा सवाल प्रवीण दटके यांनी केला आहे.

## थोडक्यात

### कांदा महागला! चाळीत ४० टक्केच साठा शिल्लक

**लासलगाव :** नाशिक जिल्ह्यात कांद्याच्या दराने पुन्हा एकदा साडेचार हजार रुपयांचा टप्पा ओलांडला असून, आगामी काळात कांद्याचे दर आणखी मजबूत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने दर नियंत्रणासाठी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून राखीव कांदा दिल्ली, चेन्नईसह प्रमुख महानगरांमध्ये पाठवून बाजारातील पुरवठा वाढवला होता. त्याचा परिणाम म्हणून मागील सप्ताहात कांद्याच्या घाऊक दरात क्विंटलमागे तब्बल ४०० ते ५०० रुपयांची घसरण झाली होती. मात्र, सरकारी हस्तक्षेपाचा परिणाम अल्पकाळ टिकला असून, चालू सप्ताहात कांद्याचे दर पुन्हा वाढले आहेत.

केंद्र सरकारने राखीव साठ्यातील कांदा ३५ रुपये किलो दराने महानगरांमध्ये उपलब्ध करून दिला. त्यामुळे बाजार समित्यांमधील कांद्याच्या दरावर दबाव निर्माण झाला. मात्र, यंदा केंद्र सरकारकडे राखीव कांद्याचा साठा कमी असल्याने आगामी काळात मोठ्या प्रमाणात सरकारी कांदा बाजारात आणणे शक्य होईलच असे नाही.नाशिक जिल्ह्यात चाळींत साठवलेल्या उन्हाळ कांद्यापैकी ६० ते ६५ टक्के कांदा विकला गेला असून, सुमारे ४० टक्के साठा शिल्लक असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. त्यातच पावसामुळे चाळीत साठवलेल्या कांद्याची गुणवत्ता खालावत असल्याने काही कांदा खराब होत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष बाजारासाठी उपलब्ध होणारा कांद्याचा साठा आणखी कमी होण्याची शक्यता आहे.

# सोमवारी कंत्राटदारांचा राज्यभर एल्गार

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये कामे करणाऱ्या कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसह निविदा प्रक्रियेतील कथित हस्तक्षेप, छोट्या कामांच्या निविदा बंद करून मोठ्या रकमेच्या निविदा काढण्याची पद्धत आणि जीएसटीच्या आर्थिक भाराविरोधात राज्यातील कंत्राटदार संघटना आक्रमक झाल्या आहेत. या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना महाराष्ट्र आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांच्या वतीने सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये दुपारी ११ वाजता निषेध आंदोलन करण्यात येणार आहे.

शासकीय विकासकामे पूर्ण केल्यानंतरही विविध विभागांकडून कंत्राटदारांची



देयके मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याचा दावा संघटनांनी केला आहे. या प्रलंबित देयकांमुळे कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, बँक कर्जावरील व्याज, कामगारांचे वेतन, बांधकाम साहित्याची देणी आणि अन्य खर्च भागविणे कठीण होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

**निविदा प्रक्रियेवरही आक्षेप**

छोट्या-छोट्या कामांसाठी स्वतंत्र निविदा काढण्याऐवजी अनेक कामे एकत्र करून मोठ्या रकमेच्या निविदा काढल्या जात असल्याचा आरोप कंत्राटदार संघटनांनी केला आहे. त्यामुळे लहान कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि मजूर संस्थांना शासकीय कामांच्या संधींपासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. राज्यातील कंत्राटदारांच्या व्यवसायावरच यामुळे परिणाम होत असल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

**राजकीय हस्तक्षेप टाळावा**

कामाच्या निविदा आणि ई-निविदा प्रक्रियेत विविध स्तरांवरून राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे. कामावरील प्रशासकीय प्रक्रियेमुळे कंत्राटदारांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलनाच्या आवाहनात नमूद करण्यात आले आहे.

**जीएसटीचा भार शासनाने घ्यावा**

शासनाकडून कंत्राटदारांच्या बिलांमध्ये जीएसटी देण्यास विलंब होत असतानाही कंत्राटदारांना वेळेत जीएसटी भरण्याची जबाबदारी पार पाडावी लागत असल्याचा मुद्दा संघटनांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे शासनाकडून बिलामध्ये जीएसटीची रक्कम मिळण्यापूर्वीच कंत्राटदारांना जीएसटी भरण्याची सक्ती होऊ नये, अशी त्यांची मागणी आहे.

**काय आहेत मागण्या ?**

प्रलंबित देयके तातडीने अदा करणे, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, छोट्या कंत्राटदारांना कामांची संधी उपलब्ध करून देणे, ई-निविदांमधील कथित हस्तक्षेप थांबविणे आणि जीएसटीसंदर्भातील अडचणी दूर करणे, या मागण्यांसाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये निवेदनही देण्यात येणार आहे. राज्यभरातील कंत्राटदार, अभियंते आणि संबंधित संस्था या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.शासन या आंदोलनाची दखल घेणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

# सीईटीच्या ४.५ लाख विद्यार्थ्यांचा गोपनीय डेटा लीक

**वृत्तसंस्था, मुंबई**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या(सीईटी) च्या राज्यातील तब्बल साडेचार लाख विद्यार्थ्यांचा डेटा लीक झाल्याची बाब खुद्द सीईटी सेलने शुक्रवार दि. ४ सप्टेंबर रोजी मान्य केल्याने राज्यातील शैक्षणिक वर्तुळात खळबळ माजली आहे. महाराष्ट्र सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाशी संबंधित तब्बल ४ लाख ५९ हजार ४९३ विद्यार्थ्यांची अत्यंत गोपनीय वैयक्तिक माहिती लीक झाल्याची गंभीर घटना उजेडात आली असून, यामुळे शैक्षणिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेत सीईटी सेलच्या प्रशासनाने मुंबईतील आझाद मैदान पोलिस ठाण्यात अधिकृत पत्र देऊन कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. १ सप्टेंबर २०२६ रोजी नारायण शिंगारे यांनी ही डेटा लीक झाल्याची बाब सीईटी सेलच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर तात्काळ पावले उचलत सीईटी सेलच्या संगणकांची व यंत्रणेची फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली. या तांत्रिक तपासात माहिती बाहेर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली तीव्र झाल्या.

**५० कोटींच्या कामाचे ८५० कोटीत कंत्राट**

रोहित पवारांनी कंत्राटाच्या रकमेवर आणि मलिदा लाटण्याच्या पद्धतीवर गंभीर आक्षेप घेतले, संबंधित कंपनी अत्यंत ताकदवान असून देशभर दरवर्षी १२ ते १५ हजार कोटींची कामे करते. महाराष्ट्र शासनाकडूनही तिला तब्बल ७०० ते ८०० कोटी रुपयांची कामे दिली गेली आहेत.

**राजकीय नेत्यांनी मलिदा लाटला : रोहीत पवार**

पूर्वी दहावी-बारावीप्रमाणे सीईटीची परीक्षा मॅन्युअली (ऑफलाइन) घेतली जायची. तेव्हा कोणत्याही तक्रारी येत नव्हत्या आणि केवळ ५० कोटी रुपयांत संपूर्ण प्रक्रिया पार पडायची. मात्र, ५० कोटींचे काम असताना ८५० कोटी रुपये का खर्च करण्यात आले ? यातून अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी मलिदा लाटल्याचा दाट संशय असल्याचे रोहीत पवार यांनी म्हटले आहे.

खासगी कन्सल्टिंग संस्था, क्लासेस, एजन्सी विद्यार्थ्यांना संपर्क करून उच्च पर्सेंटाईल आणि नामांकित कॉलेजमध्ये हमखास ॲडमिशन मिळवून देत आहेत. यासाठी प्रतिविद्यार्थी १० ते २० लाख रुपयांचा व्यवहार होत आहे.

# एसटी बसला अपघात, ४५ विद्यार्थी जखमी

**वृत्तसंस्था, धुळे**

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील म्हसदी गावाजवळ एसटी बस आणि ट्रक यांच्या भीषण अपघाताची घटना घडली. धुळे-म्हसदी मार्गावरून धावणाऱ्या एका बसला ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात शाळेत आणि कॉलेजमध्ये जाणाऱ्या ४० ते ४५ विद्यार्थ्यांसह प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य सुरू केले.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी बसमध्ये शाळा आणि कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. ट्रकची धडक इतकी भीषण होती की बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दुर्दैवी घटनेत ४० ते ४५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यापैकी ५ ते ६ विद्यार्थ्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे समजते. अपघातानंतर जखमी विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. गंभीर जखमी विद्यार्थ्यांवर वैद्यकीय पथकाकडून तातडीने उपचार सुरू आहेत. अपघाताची बातमी पसरताच पालकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली असून परिसरात भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. पोलिस या अपघाताचा पुढील तपास करत आहेत.

# उभ्या टिप्परला दुचाकीची धडक; तरुण ठार, एक जखमी

**रस्त्याच्या मधोमध इंडिकेटरशिवाय उभा होता ट्रक**

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दपार रस्त्याच्या मधोमध धोकादायक स्थितीत इंडिकेटरशिवाय उभ्या टिप्परला दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला. ही घटना ३ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता मौजा दिगलवाडी शिवारात पारशिवनीपासून ३ किमीवर घडली.

मृतक रंजित यशवंत पटले (२७, रा. मानेगाव, बालाघाट) हा स्प्लेंडर प्लस (MH 40 CZ 8997) वर मित्र प्रदीप राजू मुरवतकर (२६, रा. लाखांदूर, भंडारा) याला डबलसीट घेऊन जात होता. आरोपीने टिप्पर क्र. MH 49 BZ 5524 कोणतेही निशाण न लावता रोडवर उभा केल्याने अंधारात दुचाकी थेट टिप्परवर आढळली.

यात रंजितचा जागीच मृत्यू झाला, तर प्रदीपच्या पायाला गंभीर दुखापत झाली. फियार्दी दिनदयाल पटले यांच्या तक्रारीवरून पारशिवनी पोलिसांनी कलम २८५, १०६(१), १२५(अ) बीएनएस अन्वये टिप्पर चालक विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# यवतमाळहून पुण्याकडे जाणाऱ्या चिंतामणी ट्रॅव्हल्सचा अपघात, १० प्रवासी जखमी

**वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल्स रस्त्यालगतच्या दर्डीवर आदळली**

**दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ**


यवतमाळहून पुण्याकडे जाणाऱ्या चिंतामणी ट्रॅव्हल्सचा (एमएच २९ ए डब्ल्यू ४४४४) मनदेवजवळ अपघात होऊन दहा प्रवासी जखमी झाले. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल्स रस्त्यालगतच्या दर्डीवर आदळली. शुक्रवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास हा अपघात झाला.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. काही



जखमींना खासगी वाहनातून, तर काहींना टोलनाक्यावरील रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रवीण मानकर कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. ज्ञानोबा देवकाते यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पथक तसेच उपविभागीय परिवहन अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून वाहतूक सुरळीत केली.

दरम्यान, आर्णी मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम यांच्या पत्नी प्रिया तोडसाम यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमी प्रवाशांची विचारपूस केली. घाबरलेल्या प्रवाशांना धीर देत आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच ओंकार चेके यांनी जखमींना मदत केली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, ग्रामीण पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



"शिक्षक हेच समाजाचे खरे शिल्पकार आहेत."
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

## सं|पा|द|की|य

### अयोध्येत खांदेपालट

अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या व्यवस्थापनात मोठा प्रशासकीय बदल करण्यात आला आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची ट्रस्टचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती केली आहे. बुधवारी झालेल्या ट्रस्टच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मंदिराच्या वाढत्या प्रशासकीय, आर्थिक आणि कार्यकारी जबाबदा-यांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. यासोबतच ट्रस्टच्या व्यवस्थापन रचनेतही काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. महेश भागचंदका यांची कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, स्वामी गोविंददेव गिरी हे यापुढे महासचिव पदावर राहणार नाहीत. महेश भागचंदका, मदन मोहन पांडे आणि डॉ. निर्मला यादव यांची नव्या विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.जितेंद्र मिश्रा यांनी ६ डिसेंबर १९८६ रोजी भारतीय हवाई दलात फायटर पायलट म्हणून कारकीर्द सुरू केली. ३८ वर्षांहून अधिक काळ त्यांनी हवाई दलात सेवा बजावली असून त्यांच्या नावावर ३ हजारहून अधिक तासांच्या उड्डाणाचा अनुभव आहे. राष्ट्रीय संरक्षण अकादमी पुणे, एअर फोर्स टेस्ट पायलट्स स्कूल बंगळुरू, अमेरिकेतील एअर कमांड अँड स्टाफ कॉलेज आणि ब्रिटनमधील रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीज या प्रतिष्ठित संस्थांमध्ये त्यांनी शिक्षण घेतले आहे. लष्करी कारकीर्दीत त्यांनी फायटर स्क्वॉड्रनचे नेतृत्व केले आहे तसेच चीफ टेस्ट पायलट म्हणूनही त्यांनी काम केले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान त्यांनी वेस्टर्न एअर कमांडचे नेतृत्व केले होते. लष्करी सेवेसाठी त्यांना अति विशिष्ट सेवा पदक आणि विशिष्ट सेवा पदक यासह अनेक सन्मान मिळाले आहेत. मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या मिश्रा यांचे वडील व्याख्याते होते.सीईओ पदासाठी देशभरातून ५,५८५ अर्ज प्राप्त झाले होते. यातील १६ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यांची पार्श्वभूमी, अनुभव, व्यक्तिमत्त्व आणि व्यावसायिक क्षमता या निकषांवर मूल्यांकन करण्यात आले.

अखेर एअर मार्शल जितेंद्र मिश्रा, मेजर जनरल संजय प्रताप सिंह आणि श्रुती भारद्वाज या तीन नावांची शिफारस करण्यात आली होती. नियुक्त सीईओंकडे कायदेशीर, प्रशासकीय आणि आर्थिक बाबींची जबाबदारी राहणार आहे. संस्थेच्या आकारमान आणि कामकाजानुसार आवश्यक प्रणाली, प्रक्रिया आणि कार्यपद्धती विकसित करण्याचे कामही सीईओंकडे सोपवले जाणार आहे. ट्रस्टच्या बैठकीत कथित देणगी चोरी प्रकरणी विशेष चौकशी पथकाच्या (एसआयटी) चौकशीचाही आढावा घेण्यात आला. २६ जून रोजी चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला होता. मंदिरात जमा होणाऱ्या रोख देणगीच्या मोजणीमध्ये मानवी हस्तक्षेप कमी करण्याच्या उपायांवरही बैठकीत चर्चा झाली. यासाठी दोन बँका आणि एका आयआयटीकडून प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. ट्रस्टने २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे मंजूर केले आहेत. या वर्षात ट्रस्टचे एकूण उत्पन्न २३७ कोटी रुपये तर खर्च ११ कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले. मंदिर बांधकाम आणि संबंधित कामांवरील भांडवली खर्च ४२५ कोटी रुपये होता.

३१ मार्च २०२६ रोजी ट्रस्टकडे उपलब्ध एकूण निधी १,८८२ कोटी रुपये असल्याची माहिती देण्यात आली. राम मंदिराचे प्रशासन सांभाळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय राम मंदिर ट्रस्टने घेतला. २०२०मध्ये ट्रस्ट स्थापन झाल्यानंतर राम मंदिर व्यवस्थापनात होणारा हा सर्वांत मोठा प्रशासनिक बदल आहे. राम मंदिराच्या सध्याच्या व्यवस्थापनानुसार, राम मंदिराशी संबंधित महत्त्वाचे निर्णय विश्वस्त घेतात. राम मंदिराचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी सीईओची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतातील अनेक जुन्या व महत्त्वाच्या मंदिरांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सीईओंकडे सोपवण्यात आली आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानचा कारभार एक आयएएस कार्यकारी अधिकारी पाहतात. वैष्णोदेवी मंदिराचे व्यवस्थापनही सीईओ पाहतात. जगन्नाथ मंदिराचे व्यवस्थापन मुख्य प्रशासकाच्या आणि काशी विश्वनाथ मंदिराचे व्यवस्थापन कार्यकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीत चालते. राम मंदिर देणगीत अपहार झाल्याच्या आरोपानंतर सीईओची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# शिक्षणाच्या धंद्यातील नैतिकतेची पातळी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य


डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर


म्हणायला तर सर्वजण शिक्षणाच्या ज्ञानमंदिराकडे पवित्र व्यवसाय म्हणून पाहतात; परंतु आज व्यापारीकरणाच्या युगात हे तेच ज्ञानमंदिर राहिले आहे का, जिथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची ज्ञानज्योत प्रज्वलित करण्यासाठी विपरीत विचारसरणी आणि रूढी-परंपरा असलेल्या संपूर्ण समाजाकडून घृणा व द्वेष सहन केला होता? महात्मा ज्योतिराव फुले यांनी सामाजिक बहिष्कार, अपमान आणि विरोधाची पर्वा न करता शिक्षणाला वंचितांच्या मुक्तीचे माध्यम बनवले; राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणातील सामाजिक न्याय आणि संधीची समानता ही राज्याची जबाबदारी मानली; महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-शिक्षणाला आपल्या जीवनाचे ध्येय बनवले; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तन आणि मुक्तीचा आधारस्तंभ मानले; पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयांना ज्ञानापर्यंत समान पोहोच आणि बौद्धिक लोकशाहीचे माध्यम बनवले आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी ज्ञानाकडे विकसित आणि आत्मनिर्भर भारताची शक्ती म्हणून पाहिले. अशा सर्व महापुरुषांच्या आणि समाजसुधारकांच्या दृष्टीने शिक्षण ही विक्रीयोग्य वस्तू नव्हती, तर व्यक्ती आणि समाजाला अधिक चांगले बनविणारी सार्वजनिक नैतिक जबाबदारी होती.

आज त्याच व्यवस्थेसमोर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा आहे–शिक्षण हळूहळू ज्ञान आणि सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयापासून दूर जाऊन शुल्क, नफा, ब्रँड, परीक्षेचे निकाल आणि रोजगाराच्या बाजारपेठेत बदलत चालले आहे का? जर शिक्षणाच्या नावाखाली अनावश्यक आर्थिक भार, नियुक्त्यांमध्ये कथित पैशांचा प्रभाव, राजकीय अथवा प्रशासकीय हस्तक्षेप आणि शिक्षकांची असुरक्षितता यांसारख्या प्रवृत्ती वाढत असतील, तर संकट केवळ संस्थात्मक व्यवस्थेचे नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत नैतिक चारित्र्याचे आहे. अशा परिस्थितीत आपण पुन्हा विचार करणे आवश्यक आहे की, ज्या महापुरुषांनी शिक्षणाला समानता, स्वाभिमान, ज्ञान आणि सामाजिक मुक्तीचे साधन बनवले होते, त्याच वारशाला आपण पुढे नेत आहोत का, की नकळत शिक्षणाला अशा व्यवस्थेत रूपांतरित करत आहोत, जिथे विद्यार्थी ग्राहक, शिक्षक एक कर्मचारी आणि ज्ञान एक उत्पादन बनत चालले आहे?

आजकाल सोशल मीडिया आणि बातम्यांमध्ये शिक्षण संस्थांच्या अनेक अनुचित वर्तनाच्या वाढत्या बातम्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत असून, त्यामुळे शिक्षणाची पवित्रता कलंकित होत आहे. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये पदभरतीच्या नावाखाली प्राध्यापकांच्या दराची चर्चा सर्वांना माहीत आहे. काही दिवस वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात आणि त्यानंतर पुन्हा सर्व काही सामान्य होते. शिक्षकांचे मानसिक छळ आणि आत्महत्येच्या घटनाही सातत्याने वाढल्या आहेत. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, भरती घोटाळे, पदव्या खरेदी करणे, परीक्षेचे पेपर फुटणे, उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार, सरकारी खर्चातील अनियमितता, साहित्याच्या खरेदी-विक्रीतील गैरप्रकार आणि कमकुवत आर्थिक उत्तरदायित्व या सर्व बाबी दर्शवतात की शिक्षणाच्या कामकाजात अनेक स्तरांवर गैरप्रकार होऊ शकतात. प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असलेल्या साधारणपणे सर्वच कर्मचाऱ्यांना त्यांच्या विभागात कुठे अनुचित



किंवा भ्रष्ट कामे होतात, याची माहिती असते; परंतु बहुतेक जण याबाबत विरोध करणे पसंत करत नाहीत. 'जसे चालले आहे तसे चालू द्या,' असा दृष्टिकोन ते स्वीकारतात; परंतु या दृष्टिकोनाचा थेट परिणाम संपूर्ण व्यवस्था, समाज आणि देशावर होतो, ज्याचे गंभीर परिणाम निरपराध जनतेला शतकानुशतके भोगावे लागू शकतात.

विकसित देशांमधील शिक्षण संस्था समान गुणवत्तेवर केंद्रित असतात, जिथे श्रीमंत-गरीब आणि खासगी-सरकारी कर्मचाऱ्यांची मुले कोणत्याही भेदभावाशिवाय एकाच शाळेत शिकतात. ज्या देशाने गुणवत्तापूर्ण प्रगत शिक्षण, सुदृढ आरोग्य सुविधा आणि रोजगारनिर्मितीला महत्त्व दिले, तेच देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जाऊन विकसित झाले आहेत. जगात असे अनेक छोटे-छोटे देश आहेत, ज्यांच्याकडे शेतीसाठी जमीन नाही, पुरेशी जलसुविधा नाही किंवा ते नैसर्गिक आपत्तींनी वेढलेले आहेत; तरीही त्यांनी आपल्या चांगल्या शिक्षण प्रणालीद्वारे आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या बळावर विकास साधला. मनुष्याच्या संपूर्ण जीवनाची आधारशिला त्याच्या शिक्षणावर अवलंबून असते. शिक्षणाची गुणवत्ता आणि कौशल्येच त्याच्या भविष्याची दिशा ठरवतात. अर्थात, याचा परिणाम व्यक्तीबरोबरच त्याच्या पुढील पिढीवरही होतो. जीवनातील प्रत्येक प्रसंग आणि कार्यकलापांमध्ये शिक्षणाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हस्तक्षेप निश्चितच असतो.

परदेशात सामाजिक समरसतेचे ज्ञान मुलांना शाळेतच दिले जाते. लहान विद्यार्थ्यांना अभ्यासातील विविध विषयांसोबत घराची स्वच्छता करणे, मोठ्या व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना मदत करणे, स्वतःचे काम स्वतः करणे, घरातील पालकांच्या कामात हातभार लावणे, महिलांचा आदर करणे, असहाय व्यक्तींना मदत करणे, समाजकार्य करणे, झाडे लावणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, हस्तकला, शिल्पकला, लहान-मोठी उपकरणे दुरुस्त करणे अशा अनेक विषयांचे व्यावहारिक शिक्षण शाळेत दिले जाते. यामध्ये त्यांना शिकवले जाते की कोणतेही काम छोटे किंवा मोठे नसते; सर्व कामे महत्त्वाची आणि समान असतात. त्यासाठी त्यांना शैक्षणिक गुणही दिले जातात. ही पद्धत विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण, विकसित, सशक्त, जबाबदार, संस्कारी आणि समजूतदार नागरिक बनविण्यावर भर देते, जे प्रत्येक देशासाठी अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा येथे आपल्याकडे मुले रील पाहण्यात सर्वाधिक वेळ वाया घालवतात, तेव्हा तेथे मुले एखाद्या तरी कामात व्यावसायिकदृष्ट्या कौशल्यपूर्ण पद्धतीने पारंगत झालेली असतात.

देशात बहुतांश सरकारी कर्मचारी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी महागड्या खासगी शिक्षण संस्थांना प्राधान्य देतात. चांगले वेतन मिळत असतानाही स्वतः सरकारी शाळांमधील शिक्षक आपल्या मुलांना आपल्याच शाळेत शिकवण्यास पसंती देत नाहीत. बहुतांश खासगी शाळांमधील शिक्षक कमी वेतनावर कार्यरत असूनही चांगले परिणाम दर्शवतात, तर सरकारी संस्थांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दर्जा वाढवायला काय होते? केंद्रीय आणि नवोदय विद्यालये शिक्षणात चांगली कामगिरी करतात; परंतु या शाळांची संख्या फारच कमी आहे. या शाळांमध्ये शिक्षकांची गुणवत्ता, पदभरती आणि कार्यपद्धती अद्ययावत असतात. याच्या तुलनेत अनेक राज्य सरकारांच्या शाळांची परिस्थिती खराब दिसून येते. ग्रामीण भाग, दुर्गम प्रदेश आणि मागासलेल्या भागातील सरकारी शाळा पावसाळ्यात शिक्षा देणाऱ्या संस्थांसारख्या बनतात. चांगल्या शिक्षणाची सुविधा मिळणे तर दूरच, आपल्या शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी लहान विद्यार्थ्यांना चिखल, झुडपे, खड्डेमय रस्ते आणि काही ठिकाणी तर दुथडी भरून वाहणाऱ्या नदी-नाल्यांना जीव धोक्यात घालून पार करून शाळेत पोहोचावे लागते. अनेक शाळा भग्नावस्थेत दिसतात आणि मूलभूत सुविधांचीच कमतरता असते. गरीबांची परिस्थिती इतकी बिकट आहे की, प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० टक्के विद्यार्थी कधीही इयत्ता १२ वीपर्यंत पोहोचत नाहीत. नीती आयोगाच्या अहवालानुसार, २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत देशातील ९२ हजार सरकारी शाळा बंद झाल्या. एक लाखांहून अधिक शाळा केवळ एका शिक्षकाच्या भरवशावर आहेत.

शिक्षक कधीही सामान्य नसतो. प्रलय आणि निर्मिती त्यांच्या कुशीत वाढतात. शिक्षक आपल्या कलागुणांनी, ज्ञानाने आणि शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये नव्या सशक्त आणि विकसित समाजाची पायाभरणी करत देशाच्या भविष्याचे शिल्पकार म्हणून आपली भूमिका साकारतात. शिक्षण म्हणजे केवळ गुण, क्रमांक, पदवी आणि रोजगार नव्हे; तर चारित्र्य, सुजाण व सुसंस्कृत नागरिकत्व, सर्जनशीलता, चिकित्सक विचार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यांनाही अत्यंत महत्त्व आहे. शिक्षणाची हीच मुख्य नैतिकता आहे. जर आजचे शिक्षण विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून त्यांच्या कलागुणांना विकसित करून, त्यांना योग्य, कौशल्यपूर्ण आणि सक्षम बनवून जीवनासाठी चांगले भविष्य घडविण्यात कमकुवत ठरत असेल, तर असे शिक्षण देशात केवळ पदवीधारकांची संख्या वाढविण्याचे काम करेल, जे आजपर्यंत होत आले आहे. नुकतेच नीती आयोगानेही आपल्या अहवालात हेच नमूद केले आहे की, युवकांकडे पदवी आहे, मात्र कौशल्य नाही. शिक्षणाकडे केवळ बाजारातील उत्पादन म्हणून न पाहता, सामाजिक अधिकार आणि सार्वजनिक जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे.


– (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)
०८२३७४१७०४१


# शिक्षकांनी जबाबदारीने समाज उत्थानासाठी कार्य करावे!


रवींद्र गोविंद पांडे
नागपूर


गुरु-शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीमधील एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र भाग आहे. जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या समोर कुणाचा तरी आदर्श ठेवून वाटचाल करीत असते. आपण जीवनात कुणालाही गुरू म्हणून मानत असलो,तसे आचरण जरी करीत असलो तरी जन्मदात्या आई- वडिलांची जागा कुणीही भरू शकत नाही. कारण आम्हाला या सुंदर जगात आणण्याचा श्रेय त्यांनाच जात असल्याने जीवनातील सर्वात पहिले गुरु आमचे आई- वडील च असतात.

भारतात प्राचीन काळा पासून गुरु- शिष्य परंपरा असून शिक्षक हे आम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात. योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात.परंतू आपण या गुरू स्थानी मानणाऱ्याची आज काय अवस्था आहे याचा विचार आजच्या दिवशी आपण केला पाहिजे.आजच्या या धकाधकीच्या आयुष्यात आपण गुरू स्थानी मानलेल्यां साठी दिवसातील जाऊ द्या वर्षांमध्ये किती वेळ काढतो? याचा प्रत्येकाने अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे.

एक उदाहरण पण सत्य घटना आहे की जी मी अनुभवली आहे. एक दिवस महाल भागात गेलो असता मला शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांची भेट झाली. ते भेटताच मी त्यांना वाकून नमस्कार केला. खुप वर्षांने भेट होत असल्याने त्यांनी मला एकदम ओळखले नाही. मी त्यांना परिचय करून दिल्यानंतर त्यांनी ओळखले. आमचे रस्त्याच्या कडेला होऊन बोलणे सुरू होते. तोच त्यांचे त्यांच्या एका विद्यार्थ्याकडे लक्ष गेले आणि त्यांनी त्याला आवाज दिला. तो विद्यार्थी थोडावेळ दांदरलाच. तो जवळ येताच त्याने आपला एक हात मागे लपवून ठेवला. त्याच्या त्या हातात एक जळती सिगारेट होती.त्या विद्यार्थ्यांसोबत अवांतर गोष्टी सुरू असतांनाच त्याने. मागे लपवून ठेवलेल्या हाताला सिगारेटचा चटका बसला, आणि ती जमीनीवर पडली. त्या शिक्षकांना यावरून जे काही समजायचं ते समजले.सांगायचे तात्पर्य हे की, जे शिक्षक विद्यार्थ्यांना जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात, योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात त्याच शिक्षकाला आपल्या विद्यार्थीच्या याबाबत जे चित्र अनुभवले ते निश्चितच दुखावणारे आहे.

आपल्या गुरूस्थानी असलेल्या आई-वडील आणि शिक्षकांना आज अशा अनेक विचित्र प्रसंगांना, अनुभवांना सामोरे जावे लागते आहे. त्यांचे समाजात आजही मानाचे स्थान कायम असले तरी त्यांना आपले म्हणणाऱ्यां कडून मिळणारी वागणूक हा मात्र चिंतनाचा विषय आहे. या परिस्थितीला कोण जबाबदार आहे याचा जास्त ऊहापोह न करता प्रत्येकानेच अंतर्मुख होऊन विचार करण्याची आज पाळी आली आहे.

आई-वडील यांचे नंतर शिक्षकांकडून बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात.त्यामुळेच शिक्षकांना दुसरे पालक पण म्हटल्या जाते. आपले विचार, मत आणि व्यक्तिमत्व घडवण्यामागे आई- वडीलां सोबतच शिक्षकांचा फार मोठा वाटा असतो.चांगले संस्कार, शिस्त आणि योग्य शिक्षण देऊन जगात ताठ मानेने उभे राहण्याचे या दोघांचे मोठे योगदान असते. परंतू आज वर्तमानात या गुरू शिष्यांची आदर्श परंपरा कलंकित होत आहे असे एकंदरीतच वाटायला लागले आहे.कारण पालक आणि पाल्य,शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नातेसंबंधात आमूलाग्र बदल होतांना दिसत आहे. आई-वडिलांना घरातील वागणूक, शिक्षकांचे विद्यार्थ्यांसोबत असलेले संबंध हे वाद निर्माण होईल असेच झाले आहे.

ज्या वडिलांकडून आणि शिक्षकांकडून आदर्श ची अपेक्षा असते ते तर इतके दारू तसेच अमली पदार्थांच्या



व्यसनाधीनते मध्ये व्यग्र झाले आहेत की भविष्यात आदर्शची व्याख्या कोणती राहू शकते हाच प्रश्न पडतो. आज अनेक ठिकाणी, अनेकवेळा आई- वडील आणि पाल्य, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात जो वाद, दुर्व्यवहार होत असल्याच्या बातम्या येत असतात. घटना घडत असल्याने त्यांच्यात संवाद कमी होतांना दिसत आहे. याचा दुरगामी परिणाम समाज व्यवस्थेवर, कुटुंब व्यवस्थेवर निश्चितच होत असतो.त्यामुळे आपली ही जी आदर्श महान परंपरा अखंडपणे चालू रहावी असे जर खरोखरच वाटत असेल तर पालक आणि पाल्य, शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांनीही आपले असलेले दायित्व, जबाबदारी उत्तमरित्या समजून सर्व शक्तीने समाज निमार्णात आपला सहयोग प्रदान करायला हवे.त्यामूळे समाजातील आज जे चित्र निर्माण झाले आहे ते बदलण्यास मदत होऊ शकेल. आज भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस. भारतभर हा दिवस शिक्षक दिवस म्हणून पाळला जातो. या निमित्ताने आपण सर्व जण गुरू शिष्याच्या परंपरेला अखंडीत ठेवण्याचा प्रयत्न करू या. माझ्या गुरूजनांना तसेच आपल्याला आणि आपल्या परिवाराला शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.


- ९३२५४५७०५२

# पारशिवनी ग्रामीण रुग्णालयात सुविधांचा अभाव

## गर्भवती महिलांना व अपघातग्रस्तांना बाहेरचा रस्ता

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

रामटेक विधानसभा क्षेत्रातील पारशिवनी ग्रामीण रुग्णालय आज स्वतःच व्हेंटिलेटरवर आहे. कागदावर ५० खाटांचे श्रेणीवर्धन, प्रत्यक्षात ३० खाटा, ३ डॉक्टर आणि २५ कर्मचाऱ्यांवर ११५ पेक्षा अधिक गावांचा भार आहे. बच्छेरा, सुवरधरा, चारगाव, कोलीतमारा, ढवळापूर, किरंगीसरा, बनेरा, शिलादेवी, नरहर, घाटकुकडा, घाटपेंढरी, आंबाझरी या दुर्गम आदिवासी पट्ट्यातील गरोदर महिलांसाठी हाच एकमेव आधार आहे.




**कागदावर रुग्णालय, प्रत्यक्षात सांगाडा**

नियमानुसार ग्रामीण रुग्णालयात ३० ते ५० खाटा, अधिक्षक व स्त्रीरोग, बालरोग, भूलतज्ज्ञ, २४ तास लॅब, एक्स-रे, ईसीजी, सोनोग्राफी, रक्तपेढी, नॉर्मल व सिझरिंग प्रसूती आणि अतिदक्षता विभाग असणे बंधनकारक आहे. पण पारशिवनीत निम्म्याच सुविधा आहेत. किरकोळ अपघात झाला तरी थेट नागपूरला रेफरची चिठ्ठी दिली जाते. म्हणूनच "मशीन आहे, माणूस नाही आणि मंजुरी आहे, इमारत नाही" अशी चर्चा आहे.

**मशीन आहे, माणूस नाही**

लाखो रुपयांचे एक्स-रे मशीन आहे, पण कायम तंत्रज्ञ नाही. आठवड्यातून दोन दिवसच तंत्रज्ञ येतो. ईसीजी मशीन आहे, रिपोर्ट देणारा तज्ज्ञ नाही. सर्वात गंभीर म्हणजे सोनोग्राफी मशीनच नाही. त्यामुळे प्रत्येक गर्भवतीला ४० किमी दूर नागपूर किंवा रामटेकच्या अँम्ब्युलन्स ने पाठवले जाते. कधी कधी परत यावं लागते व नंतर दुसरी तारीख दिली जाते अस्या अवस्तेत खाजगी सोनोग्राफी करून घेतात तेवा १००० रुपये मोजावे लागतात. रोजंदारीवर जगणाऱ्या आदिवासी-शेतकरी कुटुंबाने हा खर्च करायचा कसा?

**५० खाटांचे स्वप्न हवेतच**

तीन वर्षांपासून ५० खाटांच्या घोषणा होत आहेत, पण एक वीटही रचली गेली नाही, एक खाटही वाढली नाही. मंजुरीचे पत्र आहे, इमारत नाही. हा आरोग्याशी खेळ आहे की थट्टा? असा सवाल आहे.
विकासाच्या गप्पा मारणाऱ्या मंत्री महोदयांनी व शासनाच्या प्रतिनिधींनी एकदा तरी अचानक भेट देऊन सोनोग्राफी, कायम तंत्रज्ञ, सिझरिंग सुविधा आणि नियमित औषधपुरवठा तात्काळ सुरू करावा, अशी मागणी होत आहे.

**नॉर्मल इथे, सिझर बाहेर**

येथे केवळ नॉर्मल डिलिव्हरी होते. सिझरिंगसाठी स्त्रीरोग तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, रक्तपेढी काहीच नाही अशी चर्चा आहे. प्रसूतीकळा सुरू असतानाच महिलेच्या हातात रेफर चिठ्ठी. अर्ध्या रस्त्यात जीव गेला तर जबाबदार कोण? हा गंभीर प्रश्न आहे.

## मेंढ्या-बकऱ्यांवर दरोडा टाकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश!

### ११ आरोपींसह तीन विधिसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग, संघटित गुन्हेगारीचे कलम वाढविले

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील रोहणा परिसरात शेतातील गोठ्यावर दरोडा टाकून मेंढ्या-बकऱ्या चोरून नेणाऱ्या टोळीचा जलालखेडा पोलिसांनी पदार्फाश केला आहे. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी तब्बल ११ आरोपींना अटक केली असून, तीन विधिसंघर्षग्रस्त बालकांचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे, हा गुन्हा एकट्या-दुकट्या आरोपींनी नव्हे, तर नियोजनबद्ध आणि संघटित पद्धतीने केल्याचे तपासात स्पष्ट झाल्याने आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १११ अन्वये संघटित गुन्हेगारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे रोहणा येथील शेतकरी मारोतराव बांबल यांच्या शेतातील गोठ्यावर चार अनोळखी आरोपींनी दरोडा टाकला. आरोपींनी बांबल यांचे हातपाय बांधून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर गोठ्यातील तब्बल ४५ मेंढ्या आणि १६ बकऱ्या, असा एकूण सुमारे २ लाख ८९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल वाहनात भरून जबरदस्तीने चोरून नेला. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी जलालखेडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), ३५१(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित करत आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान संतोष रामसिंग चव्हाण, देवेंद्र ऊर्फ भुऱ्या राजेंद्र पवार, सतीश भोजणसिंग जाधव, रोशन जुगल चव्हाण, सोन्याजी शेरू पवार, पवन दान्या पवार, लखन ऊर्फ लोकेश शेरू भोसले, वैभव विलासराव माहोरे, अकुंश ऊर्फ चेतन केशवराव पोकळ, योगेश दशरथ सरोदे आणि गोविंदा संजय पवार या ११ आरोपींचा सहभाग उघडकीस आला. याशिवाय तीन विधिसंघर्षग्रस्त बालकांचाही सहभाग तपासात समोर आला.

आरोपींना अटक केल्यानंतर पोलिसांनी त्यांच्या गुन्हेगारी पद्धतीचा सखोल तपास केला. हा प्रकार पूर्वनियोजित आणि संघटित स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जलालखेडा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १११ अन्वये कलमवाढीचा प्रस्ताव काटोलचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यामार्फत नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर केला. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर आरोपींविरुद्ध संघटित गुन्हेगारीच्या कलमान्वये कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे ग्रामीण भागातील पशुधन चोरी करणाऱ्या टोळ्यांना मोठा धक्का बसला असून, शेतकरी व पशुपालकांमध्ये पोलिसांच्या कारवाईबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

# ३० शिक्षकांचा 'गुरुरत्न आदर्श शिक्षक' पुरस्काराने गौरव

### औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा उपक्रम,१३ सप्टेंबरला डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात पुरस्कार सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे नागपूर शहरासह विदर्भातील ३० उत्कृष्ट शिक्षकांचा 'गुरुरत्न आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. येत्या १३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याबाबतची माहिती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संस्थेच्या सचिव भाग्यश्री पवार यांनी सांगितले की, शिक्षक दिनानिमित्त पुरस्काराने गौरव होणे ही प्रत्येक शिक्षकासाठी अभिमानाची आणि स्वप्नपूर्तीची बाब असते. मात्र जिल्हा परिषद, महापालिका तसेच राज्य शासनाच्या विविध पुरस्कारांसाठी मोठी स्पर्धा असते. पुरस्कारांसाठी असलेले कठोर निकष आणि पुरस्कारांची मर्यादित संख्या यामुळे विद्यार्थ्यांसाठी व समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे अनेक शिक्षक या गौरवापासून वंचित राहतात. याच पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आलेल्या अनुभवातून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. संस्थेतर्फे गतवर्षीही ३० शिक्षकांना गुरुरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यंदाही हा उपक्रम पुढे नेताना सुमारे महिनाभरापूर्वी विदर्भस्तरावर ऑनलाइन व सोशल मीडियाच्या माध्यमातून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते.

या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून नागपूर शहर, ग्रामीण भाग तसेच विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून तब्बल १५० शिक्षकांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर केले. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केल्यानंतर २९ ऑगस्ट रोजी संबंधित शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन त्यातून ३० उत्कृष्ट शिक्षकांची निवड करण्यात आली. या ३० शिक्षकांसोबतच नागपूरमधील शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांचाही 'गुरुरत्न' पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. तसेच शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या एका सेवानिवृत्त शिक्षणतज्ज्ञाला 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या मात्र अंतिम ३० शिक्षकांमध्ये निवड न झालेल्या इतर १२० शिक्षकांनाही शिक्षक दिनानिमित्त संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यामुळे या उपक्रमातून मोठ्या संख्येने शिक्षकांचा गौरव होणार आहे. पुरस्कार सोहळ्यास नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी निधीवन व वेदवेल यांचे सहकार्य लाभले आहे. शिक्षण क्षेत्रातील शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भाग्यश्री पवार, प्राचार्य सुभाष खाकसे, डॉ. मंदा उमाठे, डॉ. प्रज्ञा देशपांडे, डॉ. वंदना बडवाई, डॉ. शारदा रोशनखेडे, कविता पवार, कॅप्टन विजय नाईक, मनोज कुंभारे, चंद्रप्रकाश चतुर्वेदी, डॉ. शुभ्र रॉय, डॉ. पितांबर उरकुडे, आरती भोसले, मेधा नावसाळकर, निखिलेश ढवळे, आर.जे.मोना आदींनी केले आहे.

# नरखेडमध्ये भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात, ज्येष्ठांसह गुणवंतांचा सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड येथे स्वकुळ साळी समाज मंडळाच्या वतीने आद्य वस्त्रनिमार्ता व शिवपुत्र भगवान जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवसीय या जन्मोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांसह समाजातील ज्येष्ठ नागरिक, गुणवंत विद्यार्थी तसेच शासकीय व खासगी क्षेत्रात निवड झालेल्या युवक-युवतींचा सन्मान करण्यात आला.



जन्मोत्सवाचा शुभारंभ कलश स्थापना व भगवान जिव्हेश्वर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. महिलांच्या वतीने भजन संध्या व हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी मातामाय मंदिर येथे महादेवाची महाआरती करून उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी रामकृष्ण भंदीर्गे यांनी भगवान जिव्हेश्वर पोथीचे वाचन केले. सौ. लीलाबाई भंदीर्गे, शालिनीताई भंदीर्गे व रंजिता हिंगे यांनी पाळणा गायन केले. त्यानंतर ह.भ.प. रामराव भोदे महाराज यांच्या अमृतवाणीतून संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा अभंग सादर करण्यात आला. भक्तिमय वातावरणात तीर्थपूजन करण्यात आले.

या जन्मोत्सवाची सांगता सत्कार समारंभाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वकुळ साळी समाजाचे ज्येष्ठ नागरिक डॉ. सिद्धानंद काळने होते. प्रमुख पाहुणे म्हणून हरीशजी खंडेलवाल, माजी नगराध्यक्ष अभिजीतभाऊ गुप्ता, संजय चरडे, रामचंद्र तवले, अजय सोमकुवर, राजुजी होले, अभियंता संजय भागवत व सुनील बालपांडे उपस्थित होते.

स्वकुळ साळी समाज मंडळाच्या वतीने दरवर्षी समाजातील तसेच इतर समाजातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा 'भगवान जिव्हेश्वर सेवा पुरस्कार' देऊन गौरव केला जातो. यावर्षी नंदकिशोरजी मदनलालाजी खंडेलवाल यांना त्यांच्या परिवाराच्या औद्योगिक, सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'नरखेड रत्न भगवान जिव्हेश्वर सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच समाजातील दिवंगत ज्येष्ठ स्व. श्री. श्यामरावजी हिंगे यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना मरणोत्तर समाजरत्न भगवान जिव्हेश्वर सेवा पुरस्कार देण्यात आला.

नरखेड नगर परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मनोजजी कोरडे यांचा अध्यक्षपदावर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. समाजातील ज्येष्ठ नागरिक म्हणून रामकृष्णजी भंदिर्गे, श्रीमती मथुराबाई देव्हारे व सौ. कलावती तवले यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

समाजातील युवक-युवतींना शिक्षण व रोजगारासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने विविध शासकीय व खासगी नोकरीत निवड झालेल्या अमित मनोहर तवले व कुमारी तृषाली अशोक गोडबोले यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थी पायल संजय ढमाले, रितिका दिनेश बुरांडे, अश्विनी विनायक हिंगे, अथर्व चंद्रशेखर हिंगे, अनन्या मिलिंद कावलकर, आदित्य मिलिंद कावलकर, सानवी अतुल हिंगे व काश्वी सचिन हिंगे यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला नरखेडसह पांढुर्णा, मोवाड व पुसला येथील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान जिव्हेश्वर यांच्या विचारांचा आणि समाजातील एकता, संस्कृती व सामाजिक बांधिलकीचा संदेश या जन्मोत्सवातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामचंद्रजी तवले यांनी केले. सूत्रसंचालन स्वकुळ साळी समाज मंडळ नरखेडचे अध्यक्ष नरेश तवले यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमारी अनन्या मिलिंद कावलकर हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुरुषोत्तमराव तवले, उपाध्यक्ष अतुल हिंगे, सचिव मिलिंद कावलकर, सहसचिव मनोहर तवले, कोषाध्यक्ष दिवाकर भंदीर्गे, कार्यकारी सदस्य अशोक गोडबोले, दिनेश बुरांडे, विजय कावलकर, पंकज हिंगे, विक्रांत तवले, रितिक हिंगे तसेच महिला सदस्या रंजितताई हिंगे, रजनीताई तवले, अलकाताई तवले व सीमाताई गोडबोले यांनी परिश्रम घेतले.

**थोडक्यात**

## नागपूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग जनमाहिती अधिकाऱ्यांना ४० हजारांचा दंड राज्य माहिती आयोगाचा आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत मागितलेली माहिती ३० दिवसांच्या मुदतीत न दिल्याने नागपूर जिल्हा परिषद माध्यमिक




शिक्षण विभाग येथील जनमाहिती अधिकाऱ्यांना राज्य माहिती आयोगाने ४० हजार रुपयांचा दंड ठोठावला. संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास विलंब केल्याचे तसेच सुनावणीदरम्यान अर्जदाराची बाजू योग्यरित्या ऐकून घेतली नसल्याचे आयोगाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते हेमंत गाजरे यांनी १८ ऑक्टोबर २०२४ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात दोन स्वतंत्र माहिती अधिकार अर्ज दाखल केले होते. एका अर्जातून तक्रार निवारण समिती तसेच समितीसमोर नमूद केलेल्या इतर बाबींवर झालेल्या कारवाईचा अहवाल मागवण्यात आला होता. दुसऱ्या अर्जात शिक्षणाधिकारी कार्यालयात सात दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित विविध प्रकारच्या तक्रारी आणि प्रस्तावांची माहिती मागण्यात आली होती. ही माहिती उपलब्ध करून दिल्यास माध्यमिक शिक्षण विभागातील कामकाजाची स्थिती आणि कथित अकार्यक्षमता उघड होण्याची शक्यता असल्याने माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप गाजरे यांनी केला. त्यानंतर त्यांनी हे प्रकरण राज्य माहिती आयोगाकडे नेले.

## मौदा येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी नागपूर अंतर्गत मौदा तालुका क्रीडा समितीतर्फे दिनांक ३सप्टेंबर २०२६ रोजी भवन्स एनटीपीसी विद्या मंदिर मौदा येथे तालुकास्तरीय बॅडमिंटन, चेस, कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यातील बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्ष व १७ वर्ष मुले व मुली या गटात भवन्स एनटीपीसी विद्यामंदिर मौदा यांनी प्रथम क्रमांक पटकावला व जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता पात्र ठरले.त्याच प्रमाणे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतही भवन्स एनटीपीसी विद्यामंदिर मौदा यांचा दबदबा राहिला. तालुकास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये सेंट रोसेलो स्कूल माथणी या शाळेचा दबदबा राहिला. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता मंगेश ठाकरे, प्रमोद जिद्देवार, शितल पोरे, पूजा गोरे, वैष्णवी पडोळे, अतुल मानापुरे यांनी सहकार्य केले असे मौदा तालुका क्रीडा संयोजक मीनाक्षी निर्वाण यांनी कळविले.

## पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी कार्यक्रमाच्या निमित्ताने सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथे दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात रांगोळी स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. वंजारी सर उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण डॉ. आशा रामटेके व डॉ. समृद्धी टापरे यांनी केले. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी, भारतीय संस्कृती, भक्ती आणि सामाजिक संदेश या विषयांवर आकर्षक व कलात्मक रांगोळ्या साकारून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

या स्पर्धेचे संयोजन प्रा. मसुरकर सर यांनी केले. त्यांना प्रा. किरण पुडके, डॉ. हिना कौसर आणि प्रा. सोनल मालवीय यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळाले तसेच भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला.

## गणेशोत्सवानिमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न, रमेश बरकते यांचे मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आगामी सण उत्सव तसेच गणेशोत्सवानिमित्त शांतता कमिटीची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते रामटेक यांचे अध्यक्षतेखाली, सुरेश वाघचौरे तहसीलदार पारशिवनी आशिर्वाद नागपुरे, तालुका वैद्यकीय अधिकारी पारशिवनी, चंद्रकांत शेळमाके उपअभियंता म.रा.वि.वि.कंपनी पारशिवनी, निखिल ढोले प्रभारी मुख्याधिकारी नगरपंचायत पारशिवनी, पीडब्ल्यूडीचे कर्मचारी, पंचायत समिती पारशिवनीचे प्रतिनिधी, किशोर शेरकी सहायक पोलिस निरीक्षक पोलीस स्टेशन पारशिवनीचे उपस्थितीमध्ये शांतता कमिटी, पोलीस पाटील, गणेश उत्सव मंडळ, डीजे चालक व मालक यांची बैठक शुक्रवारी आयोजित करण्यात आली होती, सदरवेळी गणेश मंडळ यांना गणेश उत्सवा दरम्यान येणाऱ्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना रूट बाबत विचारपूस करून परिपत्रकाप्रमाणे सूचना देत सनासुदीच्या दिवसांत कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी या करीता सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या वेळी मोठ्या संख्येने गावकरी, पोलीस पाटील, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्त



# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीत हिंदी माध्यमाच्या उमेदवारांवर अन्यायाचा आरोप !

## पात्र उमेदवारांमध्ये संताप, भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवून सुधारित यादी जाहीर करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**



पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप उमेदवारांकडून करण्यात आला आहे. शासनाचे नियम व निकष बाजूला ठेवून इतर माध्यमातील उमेदवारांना हिंदी माध्यमाच्या पदांवर नियुक्ती दिल्याचा दावा करण्यात आल्याने भरती प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**१० वी मराठी माध्यम, मात्र नियुक्ती हिंदी माध्यमाच्या पदावर ?**

उमेदवारांच्या म्हणण्यानुसार, काही उमेदवारांचे इयत्ता १० वीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असून त्यांनी पुढील शिक्षण डी.एड. किंवा बी.एड. हिंदीतून पूर्ण केले आहे. अशा उमेदवारांना हिंदी माध्यमाच्या शिक्षक पदांवर संधी मिळाल्याचा आरोप आहे. याउलट, हिंदी माध्यमातून आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेल्या उमेदवारांना मात्र नियुक्तीपासून वंचित राहावे लागत असल्याने पात्रता समान असेल तर संधीही समान मिळायला हवी, अशी मागणी जोर धरत आहे.

पसंतीक्रमातच पदे न दाखवल्याचा आरोप

गोंदिया जिल्हा परिषदेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या गणित-विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि हिंदी भाषा विषयांच्या काही जागा तसेच जळगाव जिल्हा परिषदेतील हिंदी विषयाच्या ११ जागा हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना पसंतीक्रम भरताना उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याचा आरोप आहे.

विशेष म्हणजे, इतर माध्यमांचे पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने काही पदे रिक्त राहिल्याचा दावा उमेदवारांनी केला आहे. त्यामुळे पद उपलब्ध असताना पात्र उमेदवारांना संधी का मिळाली नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून आश्वासन; उमेदवारांचा संताप

या प्रकरणातील त्रुटी दूर करून सुधारित निवड यादी जाहीर करावी, या मागणीसाठी उमेदवारांच्या शिष्टमंडळाने शिक्षण आयुक्त कार्यालयात धाव घेतली. मात्र, पहिल्या टप्प्यातील यादीत सुधारणा होणार नसून पुढील फेरी किंवा कन्व्हर्जन राऊंडमध्ये बाब पाहिली जाईल, असे उत्तर मिळाल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे.

**पहिल्या टप्प्यातच न्याय द्या- उमेदवारांची मागणी**

भरती प्रक्रिया पुढे गेल्यानंतर सुधारणा करण्याऐवजी पहिल्याच टप्प्यात पात्र उमेदवारांना न्याय मिळावा, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे. अन्यथा न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

हिंदी माध्यमातील पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार न्याय्य संधी मिळणार का? याकडे आता संपूर्ण शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

---

थोडक्यात

## प्रभाग २८ मध्ये अनियमित पाणीपुरवठा समस्येसाठी काँग्रेसचे निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रभाग क्रमांक २८ परिसरातील चिटणीस नगर, धन्वंतरी नगर, रमणा मारुती नगर, पवनसुत नगर आणि आदर्श नगर या परिसरातील नागरिकांना मागील ८ ते १० दिवसांपासून नियमित वेळेत व पुरेशा दाबाने पाणी मिळत नसल्याने व काही भागांमध्ये गढूळ पाणी येत असल्यामुळे तसेच नागरिकांना वाढीव पाणीबिले प्राप्त झाल्याच्या समस्येबद्दल प्रभाग क्रमांक २८ चे काँग्रेसचे पदाधिकारी यांनी महानगरपालिका कार्यालयात धडक दिली व इशारा दिला जर समस्या लवकर सोडविल्या गेल्या नाही तर आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल. यावेळी प्रामुख्याने काँग्रेस कमिटी ब्लॉक ४ अध्यक्ष राहुल अभंग, ईश्वर ढोले, मधू पडोळे, नागपुरे, राजू केचे, मानमोडे, माधव आचार्य, महिला काँग्रेसच्या ज्योती जारोंडे, रेखा बसेशंकर, जीवन बळवाई,सौरभ काळमेघ, आकीब शेख तसेच चिटणीस नगर, धन्वंतरी नगर आणि रमणा मारुती परिसरातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## विशेष सखोल पुनरीक्षण अंतर्गत मतदार यादी निरीक्षकांच्या भेटीचा कार्यक्रम जाहीर

### नागपूर येथे ७ सप्टेंबरला राजकीय पक्षांच्या बैठकीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत नागपूर विभागाच्या विभागीय आयुक्त यांची मतदार यादी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे दावे व हरकती सादर करण्याच्या कालावधीत मतदार यादी निरीक्षकांची राजकीय पक्षांसोबत पहिली बैठक दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजता आयोजित करण्यात आली आहे. यावेळी संबंधितांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार दि. १.१०.२०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचे सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत मतदार यादी निरीक्षक जिल्हानिहाय एकूण तीन भेटी देणार आहेत. या भेटीदरम्यान लोकप्रतिनिधी म्हणजेच खासदार, आमदार तसेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीला सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी आवश्यक त्या सर्व माहितीसह उपस्थित राहण्याचे आदेश सामान्य प्रशासनचे अपर आयुक्त यांनी दिले आहेत.

## वडिलांचा आधार हरपला, माणुसकीने दिला अखेरचा आधार!



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेरमध्ये अवघ्या २७ वर्षीय अनिल फुलसु उईके या तरुणाचा राहत्या घरी दुर्दैवी मृत्यू झाला. मुलाच्या मृत्यूने वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड यांच्या पुढाकाराने तसेच सावनेर पोलीस उपविभागाचे सागर खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली मर्ग दाखल करुण पुढील कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करण्यात आल्या.आणि आर्थिक परिस्थितीमुळे मुलाच्या अंतिम संस्काराचाही प्रश्न उभा राहिला. अशावेळी हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने रुग्णालयात दाखल करण्यापासून ते अंतिम संस्कारापर्यंत कुटुंबाची साथ सोडली नाही.तर ढरकउमेश मेश्राम सर यांनी पुढाकार घेत आनिल च्या मुतदेहास सन्मानाने अखेरचा निरोप मिळवून दिला. वडिलांचा आधार हरपला पण संकटाच्या काळात माणुसकी त्यांच्या सोबत उभी राहिली.

## केंद्रीय मंत्री गडकरींनी केला मोहम्मद इस्त्राईल यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या नाग नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाचे तांत्रीक सल्लागार मोहम्मद इस्त्राईल यांचा केंद्रीय परिवहन व राष्ट्रीय राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सत्कार केला. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इस्त्राईल यांच्या कामाची प्रशंसा केली. नाग नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला केंद्र व राज्य सरकार तसेच जिकाकडून मंजूर मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच यापुढेही केंद्र सरकारकडे नागपूरचे प्रलंबित असलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी इस्त्राईल यांनी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

---

# रणरागिणी हिरकणी फाउंडेशनतर्फे ऑक्सिजन कन्सन्ट्रेटर सेवेचा शुभारंभ

## महिला शक्ती, साहस अन् एकजुटीचे दहीहंडी उत्सवात दर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- (धनंजय पांढरे)**



रणरागिणी हिरकणी फाउंडेशन व हिरकणी ढोल-ताशा पथक, बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला दहीहंडी उत्सवाचा नववा वर्धापनदिन उत्साह, जल्लोष आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. येनबोडी येथील बल्लारपूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात महिला व बालिकांनी धाडस, संतुलन, एकजूट आणि सांघिक शक्तीचे प्रभावी दर्शन घडविले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते रणरागिणी हिरकणी फाउंडेशनच्या ऑक्सिजन कन्सन्ट्रेटर सेवेचा शुभारंभ. गरजू व गंभीर रुग्णांना आवश्यकता भासल्यास वेळेवर ऑक्सिजनची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते ऑक्सिजन कन्सन्ट्रेटरचे विधिवत लोकार्पण करण्यात आले.

यावेळी बल्लारपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अलका वाढई, चंद्रपूर महानगरपालिकेच्या सभापती मनस्वी गिऱ्हे, गटविकास अधिकारी धनंजय साळवे, घनश्याम मूलचंदानी आणि मनोज बेले यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे पुष्पगुच्छ व स्नेहचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर महिला दहीहंडी स्पर्धेला सुरुवात झाली. विविध महिला व बालिका संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. सहभागींच्या धाडसी कामगिरीला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. स्पर्धेचे परीक्षण ओंकार गुरु व श्रृंखला चौधरी यांनी केले. त्यांच्या निर्णयानुसार गोपिका गर्ल्स टीमने प्रथम क्रमांक, राधा-कृष्णा ग्रुपने द्वितीय क्रमांक, तर बीआयटी गर्ल्स टीमने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी बल्लारपूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या ज्योत्सना अजय बाबुलकर आणि व्यवस्थापिका मेघा किरीट शुक्ला यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळेचे प्रशस्त मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल फाउंडेशनच्या वतीने शाळा व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमरन सय्यद व स्नेहा भाटिया यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रणरागिणी हिरकणी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सपना जैन, सचिव अनुराधा जोशी, हिरकणी ढोल-ताशा पथकाचे अध्यक्ष लक्ष्मण मुडे, सचिव प्रमोद कौरसे यांच्यासह संस्था व पथकाच्या संपूर्ण पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

महिला दहीहंडीच्या माध्यमातून महिलांच्या साहसाला आणि सांघिक शक्तीला व्यासपीठ मिळाले, तर त्याच मंचावरून सुरू करण्यात आलेली ऑक्सिजन कन्सन्ट्रेटर सेवा ही या उत्सवाची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारी ठरली. सांस्कृतिक परंपरेसोबत मानवसेवेचा संदेश देत रणरागिणी हिरकणी फाउंडेशनने समाजोपयोगी उपक्रमाची नवी दिशा दाखविली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

# मूलभूत पायाभूत सुविधांच्या अत्याधुनिकीकरणावर भर : जिल्हाधिकारी

## उप्पलवाडी इंडस्ट्रियल एस्टेटची संयुक्त पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उप्पलवाडी इंडस्ट्रियल एस्टेट येथील प्रलंबित समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी व पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीत जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि नागपूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी या क्षेत्राची आज प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आमदार डॉ. नितीन राऊत उपस्थित होते. येथील उद्योगांचे वाढते प्रमाण बघता या क्षेत्रातील जुन्या पायाभूत सुविधांचा व्यापक स्तरावर कायापालट करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

औद्योगिक परिसराच्या विकासासाठी स्थानिक उद्योजकांनी मुख्य समस्या व गरजा प्रशासनासमोर मांडल्या. कच्च्या व पक्क्या मालाच्या वाहतुकीसाठी संपूर्ण क्षेत्राचे तांत्रिक सर्वेक्षण करून रस्त्यांचे मजबूतीकरण व पुनर्रचना करणे, पावसाळ्यातील पाणीसाठ्याची समस्या सोडवण्यासाठी ड्रेनेज व सीवर लाईन उभारणे, उद्योगांसाठी पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करणे आणि रात्रंदिवस चालणाऱ्या कामांच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी संपूर्ण परिसरात आधुनिक पथदिवे लावणे या मुख्य मागण्यांचा यात समावेश आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी या परिसराचे सर्वेक्षण करून वेळेत अहवाल सादर करण्याच्या सूचना कुमार आशीर्वाद यांनी केल्या. यावेळी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# एस.टी महामंडळाकडे आमच्यासाठी सोई सुविधा नाही का?

## वेळेवर एसटी बस पोहचत नसल्याने उमरी पाली येथील विद्याथीर्नींचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान, विद्यार्थीनीना तासनतास बघावी लागते एसटी बसची वाट, एसटी महामंडळाचे अधिकारी उदासिन



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील उमरी पाली या गावखेडयात रामटेक आगाराची एस टी बस वेळेवर पोहचत नसल्याने येथील विद्यार्थीर्नींना शाळेत पोहचण्यास विलंब होत असल्याने विद्याथीर्नींचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याची घटना समोर आली आहे.

दरोरोज उमरी पाली येथील विद्यार्थीनी रामटेक, मनसर, नागपुर येथे शिक्षण घेण्यासाठी जात असतात मात्र रामटेक आगाराची एसटी बस कधिच वेळेवर येत नसल्याने येथील विद्याथीर्नी ना शाळा, कॉलेज, महाविद्यालय येथे वेळेवर पोहचता येत नसल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.

कित्येक वेळी एसटी बस गावात वेळेवर येत नसल्याने विद्याथीर्नी ना शाळेत न जाता घरी परत जाण्याची वेळ येते. तर अनेक विद्यार्थी ना खाजगी वाहनाने शाळेत जावे लागत आहे. रामटेक आगाराची एस टी बस उमरी पाली गावात "आज आली, उद्या नाही "अशी अवस्था महामंडळाच्या वतीने उपलब्ध करुन दिल्याने शाळकरी विद्यार्थीनी मोठा त्रास सहन करावा लागत आहे.तर कित्येक वेळा एस टी बस येतच नसल्याने विद्यार्थांना शाळेत न जाता आल्या पावली घरी परत जावे लागत असल्याने एस टी महामंडळ विद्यार्थांना सोई सुविधा देण्यात कुचकामी ठरत असल्याचे दिसून येते.

या बाबतीत कित्येक वेळा रामटेक आगार प्रमुख यांच्या कडे भ्रमणध्वनीवरुन संबंधित विषयासंबंधी तक्रारी करुन सुद्धा आगार प्रमुख उमरी पाली येथील विद्यार्थीनींच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय योजना करण्यात निरागस दिसुन येत असल्याने येथील शाळकरी विद्यार्थीनी आंदोलनाच्या तयारीत असुन एसटी महामंडळा विरोधात रोष व्यक्त करीत आहे.



प्रत्येक विद्यार्थांना शिक्षणाच्या मुलभुत अधिकार असताना विद्यार्थांना शिक्षणापासुन वंचित करण्याचे काम एस टी महामंडळाचे अधिकारी करीत आहे. मुली पाली बसस्थानकावर विद्यार्थी एस टी बस ची प्रतिक्षा दरोरोज करतात. मात्र एस टी बस वेळेवर येत नसल्याने विद्यार्थ्यांना वेळीच शाळेत पोहचता येत नसल्याने त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. कित्येक वेळा या बाबतीत संबंधीत अधिकार यांना तक्रार करुनही उपाय योजना केली जात नसल्याने एस टी महामंडळाच्या विरोधात मोठे आंदोलन विद्यार्थी सह पालक , गावकर यांच्या वतीने केले जाईल.

**- शुभम राऊत, सरपंच, उमरी पाली ग्रामपंचायत**









**- अनन्या दोनारकर, विद्यार्थीनी**

उमरी पाली ते मनसर हा प्रवास करुन शाळेत जावे लागते मात्र एस टी बस वेळेवर येत नसल्याने शाळेत वेळेवर पोहचता येत नसल्याने अभ्यासक्रम पुर्ण करत येत नाही.शैक्षणीक नुकसान होत आहे.


**- सोनाली वलुकर, विद्यार्थीनी,उमरी पाली**

परिक्षेच्या दिवसांत एसटी बस वेळेवर येत नसल्याने मोठी धावपळ करुन शाळेत पोहचावे लागते. जर एसटी बस वेळेवर गावात आल्यास आम्हाला शाळेत वेळेवर पोहचण्यास मदत होईल. अन्यथा आमचे शैक्षणिक नुकसान झाल्यास मनस्ताप सहन करुन शिक्षण घेणे बंद करावे लागेल.

**- आराधना खडसे, विद्यार्थीनी**

वेळेवर एस टी बस गावात आल्यास आम्हाला शाळेत वेळेवर पोहचता येईल.पण मात्र गावात वेळेवर एस टी बस येत नसल्याने आम्ही शाळेत जायचे कसे? हा प्रश्न निर्माण होत आहे. एस.टी महामंडळाचे अधिकारी यांचे कडे तक्रार करुन सुद्धा तक्रारींचे निराकरणासाठी तत्पर दिसुन येत नसल्याने आम्हाला पायपीट करुन शाळेत जाण्याची वेळ आली आहे.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)






"शिक्षक हेच समाजाचे खरे शिल्पकार आहेत."
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

# विद्यार्थ्यांचा दीपस्तंभ शिक्षक

डॉ. राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर


शील, क्षमा आणि करुणा यांच्या त्रिवेणी संगमाचे मूर्तिमंत रूप म्हणजे शिक्षक होय. आयुष्यातील प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे कुठेतरी एक शिक्षक उभा असतो, ज्याने त्याला घडवलेले असते, दिशा दाखवलेली असते आणि त्याच्यातील सुप्त गुणांना जागृत केलेले असते. विद्यार्थ्यांचे यश हे केवळ त्यांच्या स्वतःच्या कष्टाचे फळ नसते, तर त्यामागे शिक्षकांनी दिलेले ज्ञान, मार्गदर्शन आणि प्रेरणा यांचाही तितकाच मोठा वाटा असतो.

पूर्वीच्या काळी विद्यार्थी आश्रमात जाऊन ज्ञानार्जन करत असत. त्यावेळी धर्मशास्त्र, नीतीशास्त्र यांसोबतच दैनंदिन व्यवहारातील विविध शस्त्र व शास्त्रांचाही अभ्यास केला जात असे. काळानुसार ही पद्धत बदलत गेली आणि गावागावात शाळा निर्माण झाल्या. सुरुवातीला शेणाने सारवलेल्या साध्या शाळा असत, परंतु शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आपुलकी आणि जिव्हाळा मात्र प्रचंड मोठ्या प्रमाणात दिसून येत होता. कालांतराने या शाळांचे रूपांतर पक्क्या इमारतींमध्ये झाले, जिल्हा परिषदेच्या शाळा गावागावात उभ्या राहिल्या. त्या काळी शिक्षक गावातच राहत आणि गावातील प्रत्येक सुखदुःखात, सण-समारंभात, तंटे मिटवण्यात तसेच गावाच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका अत्यंत मोलाची ठरत असे.

२१ व्या शतकाच्या प्रारंभी डिजिटल युगाची सुरुवात झाली आणि असे वाटू लागले की, आता शिक्षकाची भूमिका हळूहळू संपुष्टात येईल. परंतु वास्तव हे आहे की शिक्षक हा सजीव प्राणी आहे आणि तो सजीवांनाच शिकवत असतो. विद्यार्थ्यांचे मन, भावना, सुखदुःख यांच्याशी शिक्षकाचा प्रत्यक्ष संबंध येतो. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक जडणघडणीच्या प्रत्येक प्रक्रियेशी शिक्षकाचे नाते जुळलेले असते. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी शिक्षण क्षेत्रातील शिक्षकाची भूमिका बदलणार नाही. कारण आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाला गुरूंची गरज असते आणि गुरु हा मानसिक व भावनिक आधार देण्याचे काम करत असतो.

कोविडनंतरच्या काळात ऑनलाईन शिक्षणाचे वारे जोरात वाहू लागले. नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आणि विद्यार्थी घरबसल्या मोबाईलवर शिक्षण घेऊ लागले. तेव्हाही असे वाटले होते की, आता तंत्रज्ञानच शिक्षकाची जागा घेईल. परंतु तंत्रज्ञान ही केवळ एक कृत्रिम व्यवस्था आहे. तिच्यात नैसर्गिक भावना, मन आणि संवेदना नसतात. विद्यार्थ्यांच्या बालमानस शास्त्रानुसार त्यांच्या शारीरिक व भावनिक सर्वांगीण विकासासाठी या नैसर्गिक गोष्टी अत्यंत आवश्यक असतात. त्यामुळेच तंत्रज्ञान कितीही विकसित झाले, तरी शिक्षकाचे महत्त्व अबाधित राहते.

अलीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयचे वारे जगभर जोरात वाहू लागले आहे. माणसाला हव्या असलेल्या गोष्टी काही क्षणांतच मिळू लागल्या आहेत. शिक्षण क्षेत्रातही एआयचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे आणि एका दृष्टीने हे उपयुक्तही आहे. मात्र शेवटी एआय हे तंत्रज्ञानच आहे. तिच्यात नैसर्गिक मानवी बुद्धिमत्ता, विचारशक्ती, मूल्यांची जाणीव आणि कल्पनाशक्ती



यांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारा प्रत्यक्ष परिणाम मर्यादित असतो. त्यामुळे जगात कितीही तंत्रज्ञान विकसित झाले, कितीही नव्या संकल्पना उदयास आल्या, तरी सजीव असणारा शिक्षकच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेसाठी कारणीभूत ठरतो.

शिक्षण क्षेत्रात अनेक संकटे येतात, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य कधीकधी बिघडते. अशा नाजूक क्षणी विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर फुंकर घालण्याचे काम शिक्षकच करत असतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, बालपणातील शिक्षक-विद्यार्थी नाते हे मुलाच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. एक विश्वासू, प्रोत्साहन देणारा शिक्षक विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो, त्याची भीती कमी करतो आणि त्याला अपयशातूनही उभे राहण्याची ताकद देतो. बालवयात मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आणि आधार पुढील आयुष्यातील निर्णयक्षमता, आत्मसन्मान आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षक हा केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देत नाही, तर विद्यार्थ्याच्या मनात सुरक्षिततेची, आपुलकीची आणि विश्वासाची भावना निर्माण करतो.

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण दडलेले असतात, पण ते गुण ओळखण्याचे आणि त्यांना योग्य दिशेने वळवण्याचे कार्य शिक्षकच करत असतो. एखाद्या विद्यार्थ्याची कमकुवत बाजूही शिक्षक बारकाईने ओळखतो आणि त्याला त्यावर मात करण्यासाठी योग्य खतपाणी घालतो. तो विद्यार्थ्याला प्रोत्साहन देतो, प्रेरणा देतो आणि चुकल्यास प्रेमाने समजावतो. हीच प्रक्रिया विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व घडणीत निर्णायक ठरते. एखादा विद्यार्थी गणितात कच्चा असला तरी चित्रकलेत हुशार असू शकतो, एखादा खेळात प्रवीण असू शकतो तर दुसरा विद्यार्थी वक्तृत्वात उत्तम असतो. या सर्व गुणांना ओळखून त्यांना वाव देण्याचे कसब केवळ अनुभवी आणि संवेदनशील शिक्षकाकडेच असते.

यासोबतच शिक्षक हा विद्यार्थ्याला केवळ परीक्षेत गुण मिळवून देणारा व्यक्ती नसतो, तर तो त्याला आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर सक्षमपणे उभे राहण्याची ताकद देणारा शिल्पकार असतो. जीवनातील संघर्षांना धैर्याने सामोरे जाणे, परिश्रमाची सवय, वेळेचे नियोजन, शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी ही जीवनमूल्ये शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात रुजवत असतो. या संस्कारांच्या बळावर विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभा राहतो आणि आत्मविश्वासाने जीवनाचा प्रवास सुरू करतो. ज्ञानासोबतच चारित्र्य, विवेक, संवेदनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे कार्यही शिक्षक सातत्याने करत असतो. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेल्या अमर्याद शक्यता ओळखून त्याला योग्य दिशा देणे, त्याच्या स्वप्नांना बळ देणे आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वातील उत्तम गुणांना फुलवणे, हीच शिक्षकाच्या कार्याची खरी ओळख आहे. म्हणूनच शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार, प्रेरणादाता आणि उज्ज्वल भविष्याचा पाया रचणारा खरा कार्यकर्ता आहे.

शिक्षक हा काल महत्त्वाचा होता, आजही महत्त्वाचा आहे आणि भविष्यातही तितकाच महत्त्वाचा राहील.शिक्षकाची, मार्गदर्शकाची आणि सुलभकाची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकणार नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मग तो बौद्धिक असो, शारीरिक असो, भावनिक असो वा सामाजिक, शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि प्रेरणादायी ठरते.

विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे योगदान हे शब्दांत मोजता येण्यासारखे नाही. शील, क्षमा आणि करुणेचा त्रिवेणी संगम असलेला शिक्षक विद्यार्थ्याच्या आयुष्याला केवळ आकारच देत नाही, तर त्याला जगण्याची दिशाही देतो. ज्ञान, संस्कार, मूल्ये, आत्मविश्वास आणि चारित्र्य यांचा मजबूत पाया घालून तो विद्यार्थ्याला यशस्वी, जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक बनवतो. तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही मानवी स्पर्श, संवेदना आणि आपुलकी यांची जागा कोणतीही यंत्रणा घेऊ शकत नाही. म्हणूनच प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याने आपल्या यशाचे श्रेय आपल्या शिक्षकांना देणे, हीच त्यांच्याप्रती व्यक्त होणारी खरी कृतज्ञता आहे. शिक्षक हा केवळ शिक्षण देणारा नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा दीपस्तंभ आहे आणि समाजाच्या प्रगतीचा खरा शिल्पकार आहे.

- ९१४५७७९०५०

# कृष्णामाई उत्सवः अष्टादि तीर्थाटनांचा अलभ्य लाभ

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

कृष्णामाई उत्सव हा कृष्णा नदीशी संबंधित एक प्रमुख धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे, जो प्रामुख्याने महाराष्ट्रात साजरा केला जातो. महाराष्ट्रात कृष्णा नदीच्या काठावर वसलेली वाई, कराड, संगम माहुली आणि लिंब यांसारख्या गावांमधील घाटांवर हा उत्सव मोठ्या उत्साहात होतो. सांगलीतही विविध उपक्रमांनी हा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव दरवर्षी माघ शुक्ल प्रतिपदा ते फाल्गुन पौर्णिमा या कालावधीत संपन्न होतो. या काळात रोज सकाळी लघुरुद्र, सप्तशती पाठ, विशेष पूजा, मंत्रजागर आणि संध्याकाळी आरती केली जाते. रोज संध्याकाळी भजने, हळदीकुंकू, तसेच कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, गायन आणि नृत्य यांचे आयोजन केले जाते. उत्सवादरम्यान प्रत्येक घाटावर महाप्रसादाचा कार्यक्रम होतो, ज्यामध्ये हजारो भाविक सहभागी होतात. शेवटच्या दिवशी ललिताच्या कीर्तनाने या उत्सवाची सांगता होते. या उत्सवामध्ये सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येतात. घाटावर महिलांचे हळदीकुंकू आणि इतर सामाजिक कार्यक्रम होऊन सामाजिक समतेचा आदर्श पाहायला मिळतो. वाईच्या कृष्णामाई उत्सवात याबद्दलची माहिती अधिक लोकाभिमुख करत सांस्कृतिक वारसा जपला जातो. सांगलीतही कृष्णा नदीच्या महोत्सवानिमित्त दीपोत्सव आणि नद्यांच्या पूजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

कृष्णा नदी ही साक्षात विष्णुस्वरूप आणि वेणी ही शिवस्वरूप असून दोन्ही नद्या एक अभिन्नपणे वाहतात. कृष्णा नदीला संपूर्ण कृष्णा हे नाव नसल्यामुळे तिला कृष्णावेणी असे संबोधतात. अशा या दोन नद्या व शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी तथा सरस्वतीवरून पंचगंगा असे सात मिलन श्रीनरसिंहवाडी या क्षेत्री आहेत. आसमंतात श्रीदत्तगुरुंचा संचार झाल्याने त्यांच्या रजःकणांनी हे क्षेत्र अत्यंत पवित्र आहे. श्री दत्तमहाराजांचे हे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पवित्र अशा या कृष्णा तटावर देववर्षी, राजर्षी, महान तपस्वी साधू आणि धर्मनिष्ठ लोक मोठ्या आनंदाने आणि सुखाने येतात. त्यांनी आपले पुण्याश्रमही या तीरावर कायम राहण्यासाठी थाटले आहेत. अनेकदा श्रीनरसिंहवाडी क्षेत्र हे भूवैकुंठ म्हणून गणले गेले आहे. या कृष्णातीरावर शुक्लतीर्थ, पापविनाशी, काम्य, सिद्ध, अमर, कोटी, शक्ती व प्रयागती अशी अष्टतीर्थे असून ती पवित्र व रमणीय आहेत. ही तीर्थे सर्व महापातके- कायिक, वाचिक व मानसिक पापांचे निर्दालन करणारे आहेत. दर्शनमात्रे सर्व पातकांचा नाश होतो तर प्रत्यक्ष स्नान आणि तीर्थ जलपान घडत असताना सर्व पातकांचा नाश तर होईलच संशय काय! या अमर क्षेत्रास अपूर्व असे पावित्र्य प्राप्त आहे.

या स्थानी वास घडावा अशी योगी, ज्ञानी, भक्तजन इच्छा करतात. येथे वापरल्या जाणाऱ्या परमेश्वराच्या तादात्म्यात संपूर्ण आनंदच अधिक आवडतो. या तीर्थराजांच्या दर्शनाने तात्काळ सर्व जीवांची पातके नष्ट होतात. अतिरिक्त आत्मिक, आधिदैविक व अधिभौतापही नष्ट होऊन चित्तवृत्ती शांत होते. राजाधिराज श्रीदत्तमहाराजांची चिरकाल वास करण्याची ही पुण्य क्षमता व राजधानी आहे-

"श्रीदत्ताची राजधानी
पाहोनि धन्य होती जीवनी
चारी पुरुषाथुर्नी
अंती जाती स्वगार्सी"

राजा ज्याप्रमाणे आपल्या राजधानीत फक्त सिंहासनावर बसून प्रजाजनांची गाऱ्हाणी ऐकतो व दुःखे दूर करतो, तद्वत श्रीदत्तमहाराज या राजधानी सिंहासनावर विराजमान होऊन उच्चभूतप्रेत-पिशादि सर्व पीडा दूर करतात व आपल्या भक्त जनांना सुखमय करतात. हे श्रीदत्ताचे जागृतस्थान म्हणून गणले आहे. अशा या परमपावन रमणीय सप्तनद्यांच्या संगमाने पवित्र सप्त संगमस्थानावर श्रीदत्तप्रभूंचा द्वितीय अवतार झाला. भगवान नरसिंहसरस्वती महाराजांनी बारा वर्षे सातत्याने आपल्या तपश्चर्येने ही भूमी पवित्र केली व भक्त लोक मनोकामना पूर्ण करण्यासाठी येतात. जेथे आपल्या "मनोहर पादुका" ठेवल्या त्या स्थानावर त्यांच्या मनोहर दर्शनाने आज सर्वांची कामना पूर्ण केली जाते. श्रीक्षेत्र नरसिंहवाडी येथे गेल्या सव्वाचारशे वर्षांपासून श्रीकृष्णवेणी उत्सव मात्र घडत असतो. दहा दिवस चालणाऱ्या उत्सवात पुराण याविषयासाठी कृष्णामहात्म्य सांगतो.

**कृष्णा नदी माहितीः**

कृष्णा नदी दक्षिण भारतातील एक प्रमुख नदी असून पाण्याची आवक व नदीपात्राच्या क्षेत्रफळाच्या बाबतीत देशातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी नदी आहे. कृष्णा महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगाणा व आंध्र प्रदेश या राज्यातून सुमारे १३०० किलोमीटरचा प्रवास करून बंगालच्या उपसागराला मिळते. सातारा जिल्ह्यातील सह्याद्रीच्या डोंगर रांगेत असलेल्या महाबळेश्वर मधील पंचगंगा मंदिराजवळ कृष्णेचा उगम होतो. याच परिसरात कृष्णा बरोबर कोयना, वेण्णा, सावित्री, गायत्री या नद्यांचाही उगम होतो व त्या वेगळ्या दिशांनी वाहत जातात. यातील सावित्री व गायत्री पश्चिम वाहिनी नद्या असून त्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात, तर वेण्णा व कोयना या कृष्णाच्या उपनद्या असून त्या दक्षिणवाहिनी आहेत. कृष्णा पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून तिच्या उगमाजवळ महाबळेश्वरमध्ये ६२५ से.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद होते. तर जवळच असणाऱ्या पाचगणीमध्ये सरासरी २५० से.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद होते. कृष्णेचे पात्र उन्हात कोरडे पडत असल्याने नदीवर जागोजागी धरणे बांधून पाणी अडविण्यात आले आहे. सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात आली आहे. कृष्णा महाबळेश्वरमधून खाली उतरून वाई मार्गे माहुली येथे येते, याच ठिकाणी तिला वेण्णा येऊन मिळते. पुढे माहुलीपासून ५० किमी अंतरावर असलेल्या कराडमध्ये तिला कोयना मिळते, याला कृष्णा कोयनेचा प्रितीसंगम असेही म्हणतात. कराडपासून पुढे जात असताना तिला सांगलीमध्ये पुर्वेकडुन येरळा तर पश्चिम बाजूने वारणा येऊन मिळते, तसेच कुरुंदवाडमध्ये पंचगंगा येऊन मिळते. पंचगंगेच्या संगमावर नरसिंहवाडी हे श्रीदत्ताचे जागृत देवस्थान आहे. याच्यानंतर दुधगंगा नदी येऊन मिळते व अखेर महाराष्ट्रातील आपला ३०० किमीचा प्रवास करून कृष्णा कर्नाटक राज्यात प्रवेश करते. बेळगांव जिल्हातून कृष्णा पुर्व वाहीनी होते, विजापूरमध्ये तिला घटप्रभा नदी येऊन मिळते, याच ठिकाणी गोकाकचा प्रसिद्ध धबधबा आहे. पुढे तेलंगणाच्या सिमेवर रायपूर येथे भिमा नदी येऊन मिळते. पुढचा प्रवास करत असताना तुंगभद्रा नदीचा संगम होतो. यानंतरच्या प्रवासात तिला दिडी, मुसी, पालेरु, मुनेर, आदी नद्या येऊन मिळतात. विजयवाडा येथून पुढे कृष्णेचे ३ प्रवाह होऊन त्रिभुज प्रदेशाची निर्मिती झाली आहे. या त्रिभुज प्रदेशात कालवा जोड प्रकल्प राबवून यातून जलवाहतूक केली जाते. शेवटी ती आंध्रप्रदेशातील राजामहेंद्री येथे बंगालच्या उपसागराला मिळते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

- ९४२३७१४८८३

# आशियाई क्रिडा स्पर्धा २०२६ - भारतीच महिलांची दिमाखदार सुरुवात !

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक




मंधानाने हॉंगकॉंगविरुद्ध ६४ चेंडूंमध्ये १२४ धावा करून मिताली राजचा १०,८६८ धावांचा विक्रम मोडला. स्मृती मंधाना (१०,८८० धावा) सध्या महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणाऱ्या पहिल्या पाच खेळाडूंमध्ये आहे, तिच्यापाठोपाठ मिताली राज, न्यूझीलंडची सुझी बेट्स (१०,७४० धावा), इंग्लंडची शार्लट एडवर्ड्स (१०,२७३ धावा) आणि वेस्ट इंडिजची स्टेफनी टेलर (१०,००७ धावा) यांचा क्रमांक लागतो.

**महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणाऱ्या टॉप ५ खेळाडू**

स्मृती मंधाना - १०,८८० धावा
मिताली राज - १०,८६८ धावा
सुझी बेट्स - १०,७४० धावा
शार्लट एडवर्ड्स - १०,२७३ धावा
स्टेफनी टेलर - १०,००७ धावा

मंधानाच्या विक्रमी खेळीने महिला टी-२० आशिया कपच्या इतिहासातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येची नोंदही केली. हॉंगकॉंगविरुद्ध तिने केलेल्या १२४ धावांनी, २०२४ मध्ये दांबुला येथे मलेशियाविरुद्ध चमारी अथापथ्थूच्या नाबाद ११९ धावांचा विक्रम मोडला. अव्वल पाचमध्ये २०१८ मध्ये मलेशियाविरुद्ध मिताली राजच्या नाबाद ९७ धावा, २०२२ मध्ये थायलंडविरुद्ध श्रीलंकेच्या हर्षिता समरविक्रमाच्या ८१ धावा आणि २०२४ मध्ये नेपाळविरुद्ध भारताच्या शफाली वर्माच्या ८१ धावांचाही समावेश आहे.

**महिला टी-२० आशिया कपच्या इतिहासातील सर्वोच्च वैयक्तिक धावा**

स्मृती मंधाना - १२४, चमारी अथापथ्थू - ११९ नाबाद,
मिताली राज - ९७ नाबाद,
हर्षिता समरविक्रमा - ८१ धावा, शेफाली वर्मा - ८१ धावा.

**श्री चरणीचा जलवा**

भारतीय महिला संघाची गोलंदाज श्री चरणीने यावर्षी टी-२० क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक टी-२० बळी घेणारी श्री चरणी ही दुसरी भारतीय महिला गोलंदाज ठरली आहे. हॉंगकॉंगविरुद्धच्या महिला आशिया कप सामन्यात श्री चरणीने दोन बळी घेत शानदार कामगिरी केली. अशाप्रकारे, श्री चरणीने यावर्षी आतापर्यंत ३१ टी-२० बळी घेतले आहेत.

**उपांत्य फेरीत भारत**

महिला आशिया कप २०२६ च्या सातव्या सामन्यात भारताने हॉंगकॉंगचा १३७ धावांनी पराभव केला. भारताने हॉंगकॉंगसमोर १९४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात, हॉंगकॉंगचा संघ १६.२ षटकांत ५६ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय संघाने २० षटकांत पाच गडी गमावून १९३ धावा केल्या होत्या. स्मृती मंधानाने १४ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ६४ चेंडूंमध्ये १२४ धावांची खेळी केली. हॉंगकॉंगने भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या विजयासह, टीम इंडिया महिला आशिया कपच्या नॉकआऊट टप्प्यात, म्हणजेच उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरला. आता ५ सप्टेंबर रोजी गट टप्प्यात त्यांचा सामना पाकिस्तानशी होईल. तथापि, हा केवळ एक औपचारिकता असेल. १३७ धावांनी मिळवलेला हा विजय टीम इंडियाचा दुसरा सर्वात मोठा टी२० आंतरराष्ट्रीय विजय आहे. यापूर्वी, २०१८ मध्ये भारताने मलेशियाविरुद्ध १४२ धावांनी विजय मिळवला होता.

भारताची वेगवान गोलंदाज नंदिनी शर्मा (६ धावांत २ बळी), डावखुरी फिरकी गोलंदाज प्रेमा रावत (१२ धावांत २ बळी) आणि डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरानी (१६ धावांत २ बळी) यांच्या भेदक गोलंदाजीसमोर हॉंगकॉंगचा संघ १६.२ षटकांत केवळ ५६ धावांवर सर्वबाद झाला. हॉंगकॉंगने आपल्या शेवटच्या सहा विकेट केवळ चार धावांत गमावल्या. कर्णधार नताशा माईल्सने हॉंगकॉंगसाठी सर्वाधिक १५ धावा केल्या. तिच्या व्यतिरिक्त, केवळ मरीना लॅम्पलॉफ (१४) आणि यास्मिन दासवानी (११) यांनाच दुहेरी आकडा गाठता आला.

**पूनम यादवचा विक्रम मोडण्याच्या जवळ**

श्री चरणी महिला क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक टी२० बळी घेणारी भारतीय गोलंदाज बनू शकते. सध्या हा विक्रम पूनम यादवच्या नावावर आहे, जिने २०१८ मध्ये ३५ टी२० बळी घेतले होते. जर श्री चरणीने या वर्षी आणखी पाच बळी घेतले, तर ती एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक बळी घेणारी भारतीय महिला गोलंदाज बनेल. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर दीप्ती शर्मा आहे, जिने २०२४ मध्ये ३० बळी घेतले होते.

**मंधानाचे शतक**

मंधानाने तिचे ३६ वे टी२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले. षटकार मारून तिने आपले शतक पूर्ण केले, मात्र यासाठी तिला ४० चेंडू लागले. तिने अवघ्या १७ चेंडूंमध्ये आपले पुढचे अर्धशतक पूर्ण केले. मंधानाने ५७ चेंडूंमध्ये आपले दुसरे टी२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण करून अनेक विक्रम प्रस्थापित केले. ती महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली.

या विजयाबरोबरच भारतीय महिला संघ उपांत्य फेरीत दाखल झाला असून गतस्पर्धेत मिळविलेले सुवर्ण पदक राखण्यासाठी त्यांना आता शेवटचे दोन विजय मिळविणे अनिवार्य आहे. संघाचा सध्याचा फॉर्म व सर्वच खेळाडूंचा उत्साह बघता सुवर्णपदक मिळणे फारसे कठीण वाटत नसले तरी शेवटी क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ असल्याने जोपर्यंत विजय आपल्या झोळीत पडत नाही तोपर्यंत सर्व काही अलबेल मानण्यात अर्थ नसतो.

- ९०९६३७२०८२

# डिजिटल क्रांती आणि बदलता शिक्षक

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपण भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करतो. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. या डिजिटल युगात व तंत्रज्ञानाच्या युगात सध्याच्या बदलत्या जगामुळे शिक्षकाची भूमिका अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज असणे आवश्यक आहे.आजच्या शिक्षकांना आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान आणि स्त्रोतांची वैधता व गुणवत्ता तपासण्यास सक्षम बनवावे लागते. पारंपरिक शिक्षण आणि डिजिटल शिक्षणाच्या युगात शिक्षकाची भूमिका कमालीची बदलली आहे. पूर्वी शिक्षक हा ज्ञानाचा एकमेव मुख्य स्त्रोत मानला जायचा, परंतु आजच्या डिजिटल युगात त्यांची भूमिका एका मार्गदर्शकाची झाली आहे. माहिती इंटरनेटवर एका क्लिकवर उपलब्ध असल्यामुळे, आता शिक्षकांचे काम केवळ माहिती देणे नसून विद्यार्थ्यांना योग्य आणि अयोग्य माहितीमधील फरक शिकवणे हे आहे.

डिजिटल युगामुळे शिक्षण प्रक्रियेत परिवर्तनात्मक बदलाची गरज निर्माण झाली आहे. प्राचीन भारतापासून ते समकालीन काळापर्यंत शतकानुशतके चालत आलेल्या 'शिक्षकाच्या मूळ संकल्पने'ला आत्मसात करण्यासाठी शिक्षकाच्या भूमिकेचा उपयोग कसा करावा, यावर शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि शिक्षकांमध्ये एक विधायक आणि विचारपूर्वक चर्चा होणे आवश्यक आहे. आता शिक्षिकेला केवळ आशय कसा प्रसारित करायचा हे शिकण्याची गरज नाही, तर विद्यार्थी कसे शिकतात, कौशल्ये कशी विकसित होतात, विविध माध्यमांद्वारे ज्ञान कसे सादर केले जाते आणि त्यावर प्रक्रिया कशी होते, तसेच ते इतर इंद्रियांचा वापर कसा करतात, याच्या आकलनाने आपली कौशल्ये समृद्ध करणे आवश्यक आहे. यामध्ये ज्ञाननिर्मितीवर भरीव प्रयत्न करावे लागतील, कारण आता डिजिटल युगात शिकणाऱ्याकडे ज्ञानाचा एकच मुख्य स्त्रोत (शिक्षक) नसून, शिकण्यासाठी अनेक डिजिटल संसाधने उपलब्ध आहेत. कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे हा पैलू अधिक महत्त्वपूर्ण झाला आहे.

समाजाचे डिजिटल परिवर्तन ही एक वास्तविकता आहे. तंत्रज्ञान लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहे आणि मुले डिजिटल युगात मोठी होत आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यासाठी प्रभावीपणे तयार करण्यासाठी आणि त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी शिक्षण प्रणालीला या नवीन डिजिटल वास्तवाचे प्रतिबिंब दाखवून त्यानुसार जुळवून घ्यावे लागेल. शिक्षकांकडे उच्च स्तरावरील डिजिटल क्षमता असणे आवश्यक आहे, म्हणजेच ते त्यांच्या अध्यापन पद्धतींमध्ये डिजिटल साधने आणि तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे वापर करण्यास सक्षम असले पाहिजेत. डिजिटल क्षमतांमध्ये डिजिटल साक्षरता, शैक्षणिक सॉफ्टवेअर आणि प्लॅटफॉर्म वापरण्याचा अनुभव, आणि शैक्षणिक उपक्रमांच्या आयोजनात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान अखंडपणे समाकलित करण्याची क्षमता यांचा समावेश होतो. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या शक्यतांविषयी आणि शिक्षक त्यांच्या अध्यापन कार्यात डिजिटल साधनांचा कितपत वापर करतात याविषयी बल्गेरियन शाळांमधील शिक्षकांचे मत जाणून घेणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे. विशिष्ट डिजिटल क्षमतांच्या गरजेबद्दल शिक्षकांची मते महत्त्वाची आहेत. सर्वेक्षणाच्या निकालांवरून असे दिसून येते की, बल्गेरियातील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी अध्ययन सामग्री तयार करण्यासाठी व ती उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या सक्रिय सहभागास प्रवृत्त करण्यासाठी त्यांच्या दैनंदिन अध्यापन कार्यात डिजिटल तंत्रज्ञानाचा सक्रियपणे वापर करतात (८४.८%), तसेच हे त्यांच्या विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि कौशल्ये यांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि प्रभावी अभिप्राय देण्यासाठी एक सोयीस्कर साधन आहे. केलेल्या संशोधनातून डिजिटल पिढीच्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांना आवश्यक असलेल्या क्षमता देखील ओळखल्या गेल्या आहेत–ज्यामध्ये विविध शिक्षणशैली असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्वरूपांमध्ये स्वतः तयार केलेली इलेक्ट्रॉनिक संसाधने विकसित करण्यासाठी, तसेच ऑनलाइन वातावरणात वैयक्तिकरित्या आणि इतर शिक्षकांसोबत एकत्रितपणे काम करण्यासाठी लागणारी कौशल्ये व क्षमता यांचा समावेश आहे.

गुगल किंवा इंटरनेटवर एका क्लिकवर जगातील सर्व माहिती मिळते, पण त्या माहितीचा योग्य वापर कसा करावा हे फक्त एक शिक्षकच शिकवू शकतो. शिक्षक आपल्याला केवळ अक्षरांची ओळख करून देत नाहीत, तर संकटांशी कसे लढावे हे शिकवतात. ते आपल्यातील सुप्त गुणांना वाव देतात आणि आपल्याला एक चांगला माणूस बनवतात. कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देऊन सुंदर माठ बनवतो, तसेच शिक्षक आपल्यातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवतात. आपण आयुष्यात कितीही मोठे झालो, तरी आपल्या यशाचा पाया शिक्षकांनीच रचलेला असतो.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुदेवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥"

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्याच्या आयुष्याला योग्य आकार देणारा शिल्पकार होय. ज्ञानाचा दिवा घरोघरी पोहोचवण्याचे काम शिक्षक करतात. शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करून त्यांना एक जबाबदार नागरिक बनवतात. आपल्या आयुष्यातील अंधार दूर करून प्रकाशाकडे नेणारा मार्ग म्हणजेच गुरु. त्यामुळेच समाजात शिक्षकांना सर्वोच्च स्थान दिले गेले आहे.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. आज खडू आणि फळ्याची जागा डिजिटल स्क्रीनने घेतली आहे. यामुळे शिक्षण प्रत्येकाच्या हातामध्ये (मोबाईल स्क्रीनवर) पोहोचले आहे. परंतु, या तांत्रिक प्रगतीमध्ये शिक्षणाचा मूळ उद्देश म्हणजेच 'नैतिक मूल्ये आणि मानुसकी' हरवणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे. डिजिटल युगात शिक्षकाची भूमिका महत्वाची ठरत आहे तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करावा,याबाबतचे मार्गदर्शन करण्याची फार मोठी जबादारी शिक्षकांवर आली आहे.

आज प्रत्येक विद्यार्थ्याजवळ मोबाईल आला आहे. नेट व इंटरनेटवर ज्ञानाचा प्रचंड साठा उपलब्ध आहे, प्रचंड साठ्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ उडण्याची शक्यता नाकारता येत नाही,या पार्श्वभूमीवर शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरत आहे,कोणती माहिती अभ्यासासाठी उपयुक्त आहे,त्यातील कोणती माहिती घ्यावी,याबाबतीतील शिक्षक विद्यार्थ्यांना गरजेनुसार मार्गदर्शन करतात. आधुनिक शिक्षक ए आय चा वापर अध्यापनांमध्ये करत आहेत, याबाबतीत विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मोलाचे मार्गदर्शन होत आहे.डिजिटल युगातील शिक्षक हा तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण अधिक रंजक, सोपे आणि प्रभावी बनवणारा एक 'स्मार्ट मार्गदर्शक' आहे.

इंटरनेट आणि डिजिटल शिक्षणामुळे एक गोष्ट झाली आहे, ती म्हणजे शिक्षणाचे लोकशाहीकरण झाले आहे. आज, कोणीही इंटरनेटवर जाऊन त्यांना जे चांगले जमते ते शिकवायला सुरुवात करू शकतो. देशभरातील विद्यार्थी इंटरनेटवर लॉग इन करून विनामूल्य आणि सशुल्क संसाधनांचा वापर करू शकतात. याचा अर्थ असा की, शिकवण्या-शिकण्याच्या प्रक्रिया आता संस्थात्मक मर्यादांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. यामुळेच नवीन पिढीमध्ये करिअरच्या मार्गांमधील विविधतेत झपाट्याने वाढ होताना दिसत आहे.

आज मिलेनियल्स आणि जेन झेड केवळ पारंपरिक नोकऱ्यांपुरतेच मर्यादित नाहीत. ते करिअरचे पर्याय म्हणून सर्जनशील क्षेत्रे आणि उद्योजकतेकडेही पाहत आहेत; एक उत्तम उपजीविका कौशल्य विकास कार्यक्रम या तरुण विद्यार्थ्यांना त्यात मदत करेल. शिक्षणाच्या या लोकशाहीकरणामुळे समाजात शिक्षकांची भूमिकाही बदलली आहे. ते आता केवळ ज्ञानदाते राहिलेले नाहीत. विद्यार्थ्यांवर होणाऱ्या माहितीच्या भडिमारातून त्यांना मार्ग काढण्यास मदत करणे हेदेखील त्यांना आवश्यक आहे.

सोशल मीडियाच्या युगात, अनेक शिक्षकांनी ताज्या घडामोडींचे विश्लेषण, नेतृत्व प्रशिक्षण आणि अशा अनेक गोष्टींचा अवलंब केला आहे. हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा, विचारांची देवाणघेवाण आणि प्रोत्साहनाचा एक महत्त्वाचा स्त्रोत बनत आहे. शिक्षण हा केवळ पदवी मिळवण्याचा किंवा नोकरी मिळवण्याचा मार्ग नाही, तर तो मानवी जीवनाचा विकास करण्याचा पाया आहे. या दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून, ज्ञानाचा प्रसार करण्याचा आणि आपल्या गुरुंबद्दल कृतज्ञता बाळगण्याचा संकल्प केला पाहिजे. एकंदरीत, डिजिटल युगाच्या आगमनामुळे शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती झाली आहे, ज्यामुळे शिक्षकाची पारंपारिक भूमिका संपूर्णपणे बदलली आहे. पूर्वी शिक्षक हे माहिती पुरवणारे एकमेव माध्यम होते, परंतु आज इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे. अशा स्थितीत, शिक्षकाचे स्थान आता केवळ 'माहिती देणारा' न राहता एक मार्गदर्शक सुलभक आणि समुपदेशक (म्हणून पुढे आले आहे.

- ९५६१५९४३०६

# कर्मोपासक : संतसेना महाराज

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ



संत सेना महाराज व्यवसायाने न्हावी होते,म्हणून 'सेना न्हावी' म्हणून वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे. आपल्या वंशपरंपरागत न्हाव्ह्याचा व्यवसाय सेवा म्हणून करताना संत सेना महाराजांनी भक्ती मार्गही मोठ्या प्रेमाने, श्रद्धेने चोखाळला. इतर संताप्रमाणे जातीभेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून प्रत्येकांची सेवा करण्याची तयारी संत सेना महाराज आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून करीत होते.त्यांच्या कार्य कृतीव्दारे त्यांचा परमार्थ दृष्टीस पडतो.

संत ज्ञानदेव- नामदेवांचे स्थान वारकरी संप्रदायात अतिउच्च पातळीवर असताना संत सेनांचे कार्य महान भक्तिपरंपरेला वाहून घेणाऱ्या संत मंडळींच्या प्रभावळीतील आहे.शिवाय संत सेनांचे परमार्थिक कार्य विशेष उठून दिसते.

'आम्ही वारीक वारीक'
करुं हजामत बारीक ''
विवेक दर्पण आयना दावू '
वैराग्य चिमटा हालवू ''
उदक शांती डोई घोळू '
अहंकाराची शेंडी पिळू ''
भावार्थाच्या बगला झाडू '
क्राम कोध नखे काढू ''
चौवर्णा देऊनि हात '
सेना राहिला निवांत '''

संत सावता माळ्यांप्रमाणेच संत सेना महाराजांचा कर्म आणि भक्तीयोगाचा संयोग दृष्टीस पडतो.जो त्यांच्या कृती व वाङ्मयातून स्पष्ट होतो. उपरोक्त अभंगरचनेचा भावार्थ लक्षात घेता संत सेना महाराज नाभिक व्यवसाय करताना सामान्य जनांच्या मनातील बारीक-सारीक विकार,अहंकाराची हजामत करण्यासाठी तीव्र मनिषा व्यक्त करतात.ते विवेकाचा आरसा दाखवून वैराग्याच्या चिमट्याने मनातील वाईट गोष्टी दूर करतील. शांतीरुपी उदकाने त्यांचे डोळे धुतील. अहंकाराची शेंडी पिळतील. भावार्थांच्या बगला झाडून काम, क्रोधांसारख्या षड्विकारांना दूर करतील. शेवटी चारही वर्णांच्या म्हणजेच सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्र आणून शांतपणे राहतील,हे सद्गुण आणि सामर्थ्य संतांच्याठाई असतात.जणू संतांचा स्थायीभावचं मानावा. एकंदरीत संतांच्या अभंगरचना समाजाला भक्तीचा सोपान,दृष्ट विचारांपासून अलिप्त ठेवते. दूषित मनाचे क्षालन आणि आत्मिक उन्नतीसाठी असतात. संत सेना विठ्ठलाचे परमभक्त. भगवंताचा कृपाप्रसाद आणि आशीवार्दाचे दान पदरी पाडण्याचे एकमेव साधन म्हणजे नवविधा भक्तींपैकी 'नामस्मरण'भक्ती होय. श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणात संत सेना दंग राहत असत.संत नामदेवांप्रमाणे संत सेनांनी सुद्धा उत्तर भारतापासून,तर महाराष्ट्रपर्यंत तीर्थाटने करून भक्तीपरंपरा समृद्ध केली.ते नेमाने पंढरीची वारी करायचे. पंढरीच्या वारीवर त्यांचे अनेक अभंगे प्रसिद्ध आहेत. संत नामदेव, ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव, चोखामेळा,जनाबाई या संतांच्या समकालीन संत होते. या संतांचा सहवास सेनांना लाभलेली मोठी परमार्थाक मिळकत मानली पाहिजे. महान संतांच्या सहवासाने ते स्वतःला भाग्यवंत समजतात. संत ज्ञानेश्वरांमुळे मी घडलो असेही मानतात. संत ज्ञानेश्वरांना ते गुरु मानतात,अशा आशयाची एक अभंगरचना सुद्धा आहे.

'ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारुं'
उत्तरील पैलपारुं ज्ञानदेव ''
ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता'
तोडील भवव्यथा ज्ञानदेव ''
ज्ञानदेव माझे सोयरे धायरे'
जिवलग निर्धारि ज्ञानदेव''
सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान'
दाविली निज खूण ज्ञानदेवे '''

संत सेना महाराजांच्या बाबतीत चरित्रकारांनी त्यांचा जन्म महाराष्ट्राबाहेर झाला आहे,असे म्हटले आहे.परंतु तेअधिकाधिक काळ हा महाराष्ट्रात सक्रिय राहीले. उत्तर भारतातील राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश प्रांतात त्यांची तीर्थाटने झालीत. शेवटी मध्य प्रदेशात बांधवगड येथे विरक्तवृत्तीने राहून पांडुरंगाच्या नामस्मरण करीत राहिले व तिथेच निराकाराची समाधी लागली. संत सेना महाराजांच्या जीवन यात्रेच्याच्या समाप्तीला संत निळोबारायांनी रचलेली अभंगरचना पुढीलप्रमाणे आहे.

'जय जयाजी विष्णूदासा'
भक्तीभाव तुझा कैसा''
जन्मोनि न्हाव्हीयांच्या वंशी'
भक्ती केली तूवा भोळी ''
प्रत्यक्ष पूर्णब्रम्ह दावी'
राजयासी आरसा''
दावियेले कौतुक'
देव पूजेचिये वेळी''
श्रावण वद्य द्वादशी'
सेना बैसला समाधीसी''
निळा शरण प्रेमभावे '
विष्णुदास सेनियासी '''

- ९१३०८३५४५८

# आधुनिक काळातील शिक्षकाची भूमिका

सचिन चव्हाण
रामटेक, जि. नागपूर

शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारा नव्हे, तर पिढी घडविणारा शिल्पकार. समाजाच्या प्रगतीमध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असतो तो शिक्षक. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, शिक्षणाच्या पद्धती बदलल्या; मात्र विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे शिक्षकाचे कार्य आजही तितकेच महत्त्वाचे आहे. उलट, आधुनिक काळातील बदलत्या परिस्थितीमुळे शिक्षकाची जबाबदारी पूर्वीपेक्षा अधिक व्यापक झाली आहे.

एकेकाळी शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांना पुस्तकातील धडे शिकवणारी व्यक्ती, अशी त्याची ओळख होती. शिक्षक सांगतील ते ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात करायचे, हीच शिक्षणाची पद्धत होती. परंतु आज इंटरनेट, मोबाईल, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली झाली आहेत. क्षणार्धात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकते. त्यामुळे आज शिक्षकाचे काम केवळ माहिती देणे राहिलेले नाही. उपलब्ध असंख्य माहितीमधून योग्य माहिती ओळखणे, तिची सत्यता तपासणे आणि तिचा योग्य उपयोग करणे शिकवणे, ही शिक्षकाची महत्त्वाची भूमिका बनली आहे. आजचा शिक्षक हा ज्ञानदाता नसून ज्ञानाचा दिशादर्शक आहे. विद्यार्थ्यांना तयार उत्तरे देण्याऐवजी त्यांनी स्वतः विचार करावा, प्रश्न विचारावेत, समस्यांचे निराकरण करावे आणि नवीन कल्पना मांडाव्यात, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रेरित केले पाहिजे. पाठांतरापेक्षा आकलन, सर्जनशीलता आणि चिकित्सक विचार यांना महत्त्व देणारे शिक्षण आजच्या काळाची गरज आहे.

आधुनिक युगातील विद्यार्थ्यांसमोर संधी जितक्या मोठ्या आहेत, तितकीच आव्हानेही मोठी आहेत. सोशल मीडिया, इंटरनेटवरील अपुरी किंवा चुकीची माहिती, वाढती स्पर्धा आणि यशाबद्दलच्या अपेक्षा यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत शिक्षकाने विद्यार्थ्यांना योग्य-अयोग्य यातील फरक समजावून सांगितला पाहिजे. त्यांना तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण आणि जबाबदारीने वापर करण्यास शिकवले पाहिजे.

शिक्षकाची भूमिका केवळ बौद्धिक विकासापुरती मर्यादित नसावी. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. शिस्त, प्रामाणिकपणा, सहकार्य, संवेदनशीलता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करतो. गुण मिळवणारा विद्यार्थी घडविण्यापेक्षा चांगला माणूस आणि जबाबदार नागरिक घडविणे अधिक आवश्यक आहे.

आधुनिक शिक्षकाने स्वतःही सतत शिकत राहणे गरजेचे आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी, नवीन अध्यापनपद्धतींशी आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजांशी शिक्षकाने स्वतःला जोडून घेतले पाहिजे. जो शिक्षक स्वतः शिकणे थांबवतो, तो विद्यार्थ्यांना नव्या जगासाठी तयार करू शकत नाही. म्हणूनच शिक्षकामध्ये जिज्ञासा, प्रयोगशीलता आणि बदल स्वीकारण्याची तयारी असणे आवश्यक आहे. आज प्रत्येक विद्यार्थी वेगळा आहे. प्रत्येकाची क्षमता, आवड आणि शिकण्याची पद्धत वेगळी आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना एकाच मापाने मोजणे योग्य नाही. एखादा विद्यार्थी अभ्यासात हुशार असेल, तर दुसरा क्रीडा, कला, संगीत, लेखन किंवा तंत्रज्ञानामध्ये उत्कृष्ट असू शकतो. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांची ओळख करून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे हीदेखील शिक्षकाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

तंत्रज्ञानामुळे शिक्षकाचे महत्त्व कमी होईल, अशी भीती काही वेळा व्यक्त केली जाते. मात्र तंत्रज्ञान माहिती देऊ शकते; माणूस घडवू शकत नाही. संगणक प्रश्नाचे उत्तर देऊ शकतो; पण विद्यार्थ्याच्या मनातील प्रश्न समजून घेऊन त्याला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकच करू शकतो. विद्यार्थ्यांच्या भावविश्वाची जाणीव, सहानुभूती, प्रोत्साहन आणि संस्कार यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. शिक्षक हा वर्गखोलीपुरता मर्यादित नसतो. तो समाजाच्या भविष्याची पायाभरणी करतो. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, पर्यावरणाबद्दलची जाणीव, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी निर्माण झाली, तर उद्याचा समाज अधिक सक्षम आणि संवेदनशील होईल.

म्हणूनच आधुनिक काळात शिक्षकाने बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत ह्यशिकवणाराह्ण ते ह्यदिशा देणाराह्ण असा प्रवास करणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था कितीही आधुनिक झाली, तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी शिक्षकाची गरज संपणार नाही. कारण शिक्षणाचे अंतिम ध्येय केवळ माहिती देणे नसून विचार करणारा, विवेकी, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे हे आहे.

आजचा शिक्षक हा खऱ्या अथार्ने बदलत्या युगाचा दिशादर्शक आणि उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. त्याच्या हातातील खडू, पुस्तक किंवा डिजिटल साधनापेक्षा त्याचे विचार, मूल्ये आणि विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार अधिक सामर्थ्यवान आहेत. म्हणूनच शिक्षकाच्या भूमिकेकडे केवळ एक व्यवसाय म्हणून नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीच्या महत्त्वपूर्ण जबाबदारीच्या रूपाने पाहिले पाहिजे.

- ९१५८३९३२६०

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : शनिवार, ५ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## एस. टी. फ्रान्सीस विद्यालयात अग्निशमन प्रात्यक्षिक

### विद्यार्थ्यांना आग प्रतिबंध, प्रथमोपचार व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

एस. टी. फ्रान्सीस विद्यालय उदासा येथे विद्यार्थ्यांना आगीपासून सुरक्षितता, आग लागल्यास करावयाच्या उपाययोजना तसेच प्रथमोपचार याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी अग्निशमन प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्युत उपकरणे हाताळताना अचानक आग लागल्यास सर्वप्रथम घरातील अथवा परिसरातील मुख्य वीजपुरवठा बंद करण्याची पद्धत, विद्युत प्रवाह बंद करताना सुरक्षिततेसाठी वाळलेल्या लाकडी काठीचा वापर कसा करावा, तसेच शाळेत उपलब्ध असलेले अग्निशामक यंत्र योग्य पद्धतीने कसे हाताळावे, याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर मरीयम यांनी स्वतः प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना आगीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी, सुरक्षित अंतर राखणे, प्रथमोपचार आणि आपत्कालीन परिस्थितीत शांतपणे निर्णय घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अलीकडच्या काळात शाळा, दवाखाने, हॉटेल तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी आगीच्या दुर्घटना घडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लहान वयातच अग्निसुरक्षेचे प्रशिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत योग्य वेळी योग्य उपाययोजना केल्यास स्वतःसोबतच इतरांचेही प्राण वाचविता येऊ शकतात, असा संदेश या प्रात्यक्षिकातून देण्यात आला. या उपक्रमामुळे आग लागल्यास कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्याचा आत्मविश्वासही वाढला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आपली बस आता नागपूर ते आदासा मंदिर : प्रायोगिक तत्वावर बस सेवा सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या आपली बसची सेवा नागपूर-आदासा मार्गावर नियमित सुरू करण्यात आली आहे. शुक्रवार (ता.४) रोजी महापौर निता ठाकरे यांनी मोरभवन येथे हिरवा झेंडा दाखवून बस सेवाला प्रारंभ केला. मोरभवन-खंडाळा-सिल्लोरी मार्गे चार फेऱ्यांद्वारे नागरिक व भाविकांसाठी अधिक सोयीस्कर व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. याप्रसंगी स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी- वखरे, सत्तापक्ष नेतेनरेंद्र (बाल्या) बोरकर, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, सह धर्मदाय आयुक्त आभा कोल्हे, क्रीडा समिती सभापती दर्शनी धवड, नगरसेवक विजय होले, नगरसेविका माया हाडे, नगरसेविका अर्चना पडोळे, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, आदासाचे सरपंच चेतन निंबाळकर, देवस्थानचे मुलमूले व चलोची चमू, तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, आपली बसचे चालक-वाहक उपस्थित होते. परिवहन सभापती मंगला खेकरे व मा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने ४ सप्टेंबर २०२६ पासून मोरभवन (आपली बस टर्मिनल) ते आदासा मंदिर (मार्गे खंडाळा व सिल्लोरी) या मार्गावर प्रायोगिक तत्वावर आपली बस सेवेचा शुभारंभ केला आहे. या नवीन सेवेमुळे नागपूर शहर आणि ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट होणार असून, प्रसिद्ध आदासा मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांसाठी एक सोयीस्कर, आरामदायक आणि परवडणारा प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

## अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात मनपाची नोटीस कारवाई

### मनपाद्वारे सक्करदरा बाजार व शांतीनगर परिसरात अतिक्रमणविरोधी जप्तीची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महापौर निता ठाकरे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील अतिक्रमण व अवैध बांधकामाच्या विरोधात नागपूर महानगरपालिकेने धडक कार्यवाही करीत शुक्रवार (ता. ४) रोजी विविध आस्थापनांना नोटीस दिले. यात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमान नगर झोन अंतर्गत परिसरातील दोन आस्थापनेवर नोटीस बजाविण्यात आली असून अतिक्रमण करणाऱ्या दुकानांवर व ठेल्यांवर कारवाई करण्यात आली तर, सतरंजीपुरा झोनमध्ये अतिक्रमण करणाऱ्या अनधिकृत दुकाने व ठेल्यांवर कारवाई करण्यात आली.

महापौरांच्या निर्देशानुसार मनपाच्या संबंधित विभाग व झोन कार्यालयांमार्फत शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमणांची व अनधिकृत बांधकामांची पाहणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन आढळलेल्या संबंधितांना नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मॉल, दुकाने व ठेले या आस्थापना तसेच इतर स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमान नगर झोनः वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमान नगर झोन अंतर्गत सक्करदरा बाजार परिसरांतील अवैध बांधकाम व अतिक्रमणाची पाहणी करण्यात आली. त्यानुसार येथील अतिक्रमण करणाऱ्या मे. सत्यम मॉल व मे. मनोज मेटल्स या आस्थापनांना संबंधित कार्यवाही करून नोटीस देण्यात आले आहे.

# नागपूर जिल्ह्यात महावितरणचा दणका: १.३७ कोटींच्या १,०५४ वीजचोऱ्या उघडकीस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीजचोरीला पूर्णपणे पायबंद घालून प्रामाणिक वीजग्राहकांचे हित जपणे आणि महावितरणच्या महसुली सुरक्षेला बळकटी देणे या दुहेरी उद्दिष्टाने नागपूर जिल्ह्यात राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेला अभूतपूर्व यश मिळाले आहे. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या पाच महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहर अशा दोन्ही मंडलांमध्ये अत्यंत नियोजनबद्ध व कडक तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान महावितरणच्या विशेष पथकांनी तब्बल १,०५४ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणली असून, यामध्ये सुमारे १.३७ कोटी रुपये मूल्याच्या ६.३८ लाख युनिट्स विजेचा बेकायदेशीर वापर उघडकीस आला आहे.

महावितरणने पारदर्शक, सुरक्षित आणि कार्यक्षम वीज वितरण व्यवस्थेसाठी राबवलेल्या या मोहिमेअंतर्गत नागपूर ग्रामीण मंडलात ५८३, तर नागपूर शहर मंडलात ४७१ प्रकरणांचा यशस्वीरीत्या छडा लावला. वीज वितरण प्रणालीच्या मुख्य वाहिन्यांवर थेट आकडे टाकून वीज घेणे, अनधिकृत केबल्सचा वापर करणे आणि विजेच्या मीटरमध्ये तांत्रिक छेडछाड करून वीज वापरणे अशा विविध प्रकारच्या चोऱ्या या पाहणीत समोर आल्या आहेत. या मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे एप्रिल ते जुलै या पहिल्या चार महिन्यांत ६८९ प्रकरणे पकडण्यात आली होती; तर महावितरणच्या पथकांनी ऑगस्ट महिन्यात मोहिमेची तीव्रता अचानक वाढवत एकाच महिन्यात तब्बल ३६५ वीजचोऱ्या उघडकीस आणून मोठा दणका दिला.

जिल्ह्यातील विविध विभागांमध्ये राबवण्यात आलेल्या या व्यापक कारवाईत मौदा विभागाने सर्वाधिक २१४ वीजचोऱ्या पकडल्या. त्याखालोखाल औद्योगिक व ग्रामीण क्षेत्राचा



समावेश असलेल्या बुटीबोरी विभागात १५८ प्रकरणे उघडकीस आली. याशिवाय उमरेड विभागात १३३, सावनेर विभागात १३१, सिव्हिल लाईन्स विभागात ११७, काटोल विभागात ११५, गांधीबाग विभागात ९९, काँग्रेस नगर विभागात ५७ आणि महाल विभागात ४० प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली.

वीजचोरी उघडकीस आल्यानंतर महावितरणने भारतीय वीज कायदा २००३ च्या कलम १३५ आणि १३८ अन्वये अत्यंत कठोर कायदेशीर पावले उचलली आहेत. या कारवाईचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, वीजचोरी पकडण्यात आलेल्या एकूण १,०५४ ग्राहकांपैकी ५९९ ग्राहकांनी वीज बिल व दंडापोटी सुमारे ८१.५ लाख रुपयांच्या रक्कमेचा महावितरणकडे तत्परतेने भरणा केला आहे. तसेच, नियमानुसार कायदेशीर खटल्याची गुंतागुंत टाळण्यासाठी ५०३ ग्राहकांना तडजोड शुल्काचे देयक आकारण्यात आले आहे. मात्र, महावितरणच्या सूचनेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणाऱ्या आणि सहकार्य न करणाऱ्या २ ग्राहकांवर थेट पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वीजचोरी विरोधातील



महावितरणची ही मोहीम यापुढील काळात अधिक आक्रमकतेने राबविली जाणार आहे. आगामी सणासुदीचे दिवस लक्षात घेता, संभाव्य कठोर कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी ग्राहकांनी विजेचा वापर केवळ अधिकृत पद्धतीनेच करावा तसेच आपल्या नियमित वीजबिलाचा वेळेवर भरणा करावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

वीजचोरी हा भारतीय कायद्यनुसार गंभीर व दखलपात्र गुन्हा असून, गुन्ह्याचे स्वरूप आणि चोरीच्या तीव्रतेनुसार दोषींवर मोठा आर्थिक दंड तसेच तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. बेकायदेशीरपणे घेतलेल्या वीज जोडण्यांमुळे किंवा थेट आकडे टाकल्यामुळे वीज यंत्रणेवर अनपेक्षित ताण येतो; ज्यामुळे शॉर्ट सर्किट, रोहित्रांची खराबी आणि आगीच्या गंभीर दुर्घटना घडण्याचा धोका असतो. यामुळे केवळ महावितरणचे नुकसान होत नसून सर्वसामान्यांच्या जीवित व वित्ताची मोठी हानी होऊ शकते. या पार्श्वभूमीवर, सर्व नागरिकांनी कोणत्याही अनधिकृत किंवा बेकायदेशीर मार्गाचा वापर न करता केवळ महावितरणच्या अधिकृत प्रणालीद्वारेच सुरक्षित वीज जोडणी घ्यावी, असे स्पष्ट आवाहन महावितरण प्रशासनाने केले आहे. तसेच, आपल्या परिसरात कुठेही वीजचोरी किंवा वीज यंत्रणेशी छेडछाड होत असल्याचे निदर्शनास आल्यास, नागरिकांनी त्याबाबतची माहिती तत्काळ महावितरणला देऊन एका जबाबदार नागरिकाची भूमिका बजावावी, असे आवाहन देखील महावितरणने केले आहे.

## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत २ सराईत गुन्हेगार 'धोकादायक व्यक्ती' एमपीडीएअंतर्गत स्थानबध्द

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर पोलीसांनी सराईत गुन्हेगार क्र १) संजय बालाजी कडु, वय ५२ वर्ष राह. वार्ड क्र. १ आदासा, ता. कळमेश्वर पो.स्टे. सावनेर, जिल्हा नागपूर आणि सराईत गुन्हेगार क्र २) रेहमान उर्फ रेहान समीम खान, वय २५ वर्ष, रा. सटवा माता मंदिरचे मागे, सावनेर, तह. पो. स्टे. सावनेर, जिल्हा नागपुर या दोन सराईत गुन्हेगार तसेच 'धोकादायक व्यक्ती' यांना एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द केले आहे.

सराईत गुन्हेगार क्र १. संजय बालाजी कडु, वय ५२ वर्ष, राह. वार्ड क्र. १ आदासा, ता.



गुन्हेगार संजय बालाजी कडु

कळमेश्वर पो.स्टे. सावनेर, जिल्हा नागपूर याचे विरूध्द अवैध दारूबाबत अनेक गुन्हे नोंद आहे.आरोपीच्या कृत्यांमुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले त्यामुळे त्यांच्या जिवाला धोका निर्माण होत असे. आरोपीच्या त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. गुन्हेगार क्र २) सराईत आरोपी नामे रेहमान उर्फ रेहान समीम खान, वय २५ वर्ष, रा. सटवा माता मंदिरचे मागे, सावनेर, तह. पो. स्टे. सावनेर, जिल्हा नागपुर याचेवर शरीरा विरुध्द व मालमत्ते विरुध्द अनेक गुन्हे नोंद असुन साथीदारांसोबत मिळून प्राणघातक हत्यारांनी हत्येचा प्रयत्न करणे, साथीदारांसोबत मिळून गंभीर



गुन्हेगार रेहमान उर्फ रेहान समीम खान

दुखापत पोहोचवणे, प्राणघातक हत्यार जवळ बाळगणे, अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणे, साथीदारांसोबत मिळून घरफोडी करणे, सामान्य लोकांना घाबरवून-धमकावून अश्लील शिवीगाळ करणे व जीवे मारण्याची धमकी देणे, कायदेशीररित्या सुनावण्यात आलेल्या हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणे. नमुद आरोपींच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये ते भय निर्माण करून दहशत पसरवित होते.

नागपुर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरूध्द जेव्हा जेव्हा तकारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले आणि त्यांना अटक केले. पोलीसांनी आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. नमुद आरोपी गुन्हे करण्याच्या सवयीचे असुन त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते.

दोन्ही आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने सावनेर पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, नागपुर यांनी दोन्ही आरोपींचा स्थानबध्दतेचा आदेश काढला असता सावनेर पोलीसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेवुन दोन्ही आरोपींना कारागृहात स्थानबध्द केले आहे.

## प्रसिद्ध अभिनेते प्रवीण तरडे यांची ऐतिहासिक पिवळी मारबत मंडपाला सदिच्छा भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पिवळी मारबत उत्सवाच्या तांडापेठ येथील मंडपाला शुक्रवार (ता.४) रोजी प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व लेखक प्रवीण तरडे व सुप्रसिद्ध अभिनेत्री स्नेहल तरडे यांनी सदिच्छा भेट दिली. महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या देखरेखीत मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांच्या संकल्पनेतून मनपाच्या मारबत महोत्सवाचे आयोजन केले जात आहे.

त्यातच एक भाग म्हणून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांना महोत्सवासाठी निमंत्रित केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून अभिनेते प्रवीण तरडे यांनी पिवळ्या मरबत मंडळाला सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, नगरसेवक संतोष (रामभाऊ) अंबुलकर तसेच नागपूर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि मारबत उत्सवाशी संबंधित पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. तांडापेठ येथील नागोबा मारबत देवस्थान तहार्णे तेली समाजाच्या वतीने दरवर्षी पिवळी मारबत उत्सवाचे आयोजन करण्यात येते. नागपूरच्या समृद्ध लोकपरंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग असलेल्या या उत्सवाला शहराच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे.

# विषारी घोणसचा डोक्याला दंश, वेळीच उपचाराने वाचले प्राण

## एकाच घरात चार दिवसांत घोणस अन् मण्यार आढळल्याने कुटुंबात खळबळ, उमरेड परिसरात सर्पदंशाचे प्रमाण चिंताजनक

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**

पावसाळा सुरू होताच सापांचा मानवी वस्तीकडे वावर वाढतो. मात्र, उमरेड शहरातील नायडू बाजार परिसरात एका कुटुंबाला सलग दोन विषारी सापांचा सामना करावा लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्रीच्या सुमारास घरात आलेल्या तब्बल तीन ते चार फूट लांबीच्या विषारी घोणसाने बिरजू सक्सेना यांच्या डोक्याला दंश केला. प्रसंगावधान राखून तातडीने रुग्णालयात दाखल केल्याने त्यांचे प्राण वाचले.

नगर परिषद मलक वाचनालयाचे सेवानिवृत्त सहाय्यक ग्रंथपाल चंद्रकांत सक्सेना यांचा मोठा मुलगा बिरजू सक्सेना हे रात्री सुमारे ११ वाजता घरात असताना अचानक सापाने त्यांच्या डोक्याला दंश केला. दंश झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ वडिलांना आवाज दिला. पाहणी केली असता घरात तब्बल तीन ते चार फूट लांबीचा विषारी घोणस





असल्याचे दिसून आले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कुटुंबीयांनी बिरजू यांना सुरक्षित बाजूला केले आणि सर्पमित्र मुकुंद जोशी यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत घोणसाला सुरक्षितरीत्या पकडले. त्यानंतर बिरजू यांना उमरेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल कॉलेजच्या अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. चार दिवसांच्या उपचारानंतर डॉक्टरांनी त्यांना डिस्चार्ज दिला.

**दुसऱ्याच दिवशी वॉशिंग मशीनमध्ये मण्यार!**

घोणसाच्या दंशातून बिरजू सुखरूप घरी परतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कुटुंबीयांना पुन्हा धक्का बसला. घरातील वॉशिंग मशीनमध्ये अतिशय विषारी मण्यार आढळून आला. एकाच घरात अवघ्या काही दिवसांच्या अंतराने घोणस आणि मण्यार असे दोन विषारी साप आढळल्याने कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सर्पमित्रांच्या मदतीने दोन्ही सापांना सुरक्षितरीत्या पकडण्यात आले. वन विभागाला माहिती देऊन त्यांना मानवी वस्तीपासून दूर सुरक्षित जंगल परिसरात सोडण्यात आले.

**उमरेडमध्ये घोणसाच्या दंशाचे प्रमाण अधिक**

उमरेड ग्रामीण रुग्णालयातील माहितीनुसार, सन २०२५-२६ या कालावधीत घोणसाच्या दंशाचे सुमारे ६० रुग्ण उपचारासाठी दाखल झाले होते. तर एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नांद, बेसूर, पिराया, तारणा, गावसुत, कोटगाव, सिर्सी, मकडधोकडा आदी गावांमधून ३६ सर्पदंशाचे रुग्ण उपचारासाठी दाखल झाले. विशेष म्हणजे, वेळेत उपचार मिळाल्याने यापैकी एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नसल्याची माहिती डॉ. अजितसिंग खंडाते यांनी दिली. उमरेड परिसरात घोणसाच्या सर्पदंशाचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याने नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**सर्पदंश झाल्यास अंधश्रद्धेला थारा नको**

सर्पदंश झाल्यानंतर वेळ न दवडता संबंधित व्यक्तीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्पदंश झालेल्या जागी दोरी बांधणे, ब्लेडने चिरा देणे, तोंडाने रक्त किंवा विष शोषण्याचा प्रयत्न करणे अथवा घरगुती उपचार करणे टाळावे. अशा उपायांमुळे रुग्णाच्या प्रकृतीला अधिक धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्पदंशाच्या घटनांमध्ये वेळीच वैद्यकीय उपचार हाच जीव वाचविण्याचा सर्वात सुरक्षित मार्ग असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

**उमरेडमध्ये सर्पमित्रांची सक्रिय टीम**

साप मानवी वस्तीत आल्याची माहिती मिळताच नागरिकांच्या मदतीसाठी उमरेड परिसरात सर्पमित्रांची सक्रिय टीम कार्यरत आहे. यामध्ये नाना झुरमुरे, विनोद पिल्लेवाण, शरद मडाईत, मुकुंद जोशी, सचिन राऊत, सौरभ भोयर, प्रितेश गिल्लुरकर, सुनील कंचने, निखिल कातोरे, मुकेश तिवाडे, अंकित लोथे आणि जय राऊत यांचा समावेश आहे. दिवस असो वा रात्र, साप आढळल्याची माहिती मिळताच हे सर्पमित्र घटनास्थळी पोहोचून सापाला सुरक्षितरीत्या पकडतात. त्यानंतर वन विभागाला माहिती देऊन पकडलेले साप नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येतात.

**सर्पमित्रांना सुरक्षा किट देण्याची मागणी**

सर्प पकडण्याचे काम करताना सर्पमित्र स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या सुरक्षेसाठी धाव घेतात. मात्र, अनेकदा ते अपुऱ्या सुरक्षा साधनांसह घटनास्थळी पोहोचतात. त्यामुळे सर्पमित्रांना चिमटा, गमबूट, सर्प पकडण्याचा हुक, साप ठेवण्यासाठी बॅग, हेड टॉर्च, हातमोजे आणि प्रथमोपचार साहित्य असलेली अत्यावश्यक सुरक्षा किट वन विभागाने मोफत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी कुंदन राऊत यांनी केली आहे. सापांपासून नागरिकांचे संरक्षण करण्याबरोबरच सर्पमित्रांच्या सुरक्षेकडेही वन विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

थोडक्यात

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रम

### लोणारा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना युनियनतर्फे नोटबुकचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (रजि. क्र. १०२९) च्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय पदाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कोराडी शाखेतर्फे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणारा येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून नोटबुकचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्यासोबतच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोणारा ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र ढेपे होते. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणारा यांच्या मुख्याध्यापिका श्रीमती पल्लवी चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन ही केवळ कामगारांच्या हक्क व प्रश्नांसाठी कार्यरत न राहता सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी विविध उपक्रम राबवित आहे. शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सामाजिक जबाबदारी मानून हा उपक्रम राबविण्यात आला. हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी युनियनचे पदाधिकारी पुरुषोत्तम साबळे, संदिप ताजने, बाबा पन्नासे, सचिन राणे, धर्मास बोडे, मिथुन कोडापे, रवी कावळे, मिलिंद बनसोड, मनोहर बोपचे, सचिन पाखरे, पंकज सोमलकर, रवी ताजने, प्रशांत नागापूरे, अरुण भांगे, सचिन येरगुडे, अनिल मेघावत तसेच युनियनचे समस्त पदाधिकारी व सभासद यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले. सामाजिक बांधिलकीतून विद्यार्थी हित–हीच युनियनची सकारात्मक वाटचाल, या भावनेतून हा सामाजिक उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## महानुभाव नगर घोगली ले-आऊटमध्ये रस्त्याची झाली चाळण

### घरात शिरते पावसाचे पाणी, रात्रीला जीव मुठीत घेऊन चालतात नागरिक

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

ग्रामपंचायत घोगली अंतर्गत महानुभावनगर वॉर्ड क्रमांक 3 हा नागरी भाग येतो मात्र येथे नागरिकांचे वाहतुकीचे रस्ते प्रचंड खराब झालेले असून येथील नागरिकांनी अनेकदा निवेदन



ग्रामपंचायतला देऊनही कुठलीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. पावसाळ्याचे दिवस असल्याने रोड वर सर्वत्र गाळ आणि चिखलाचे साम्राज्य आहे. रस्त्याने गाड्या स्लिप होऊन अनेक नागरिक पडले आहेत. लेआऊट मधील श्रीमती मथुरे यांनी यापूर्वीच महसूलमंत्र्याकडे रोड बाबत आपली कैफियत मांडलेली होती. मंत्रीमहोदय जनता दरबारमध्ये बोलले की महानिर्मिती कडून भरीव टॅक्सेशन ग्रामपंचायतला मिळाले असून ग्रामपंचायत ची आर्थिक बाजू भक्कम आहे. त्यांनी नागरिकांच्या समस्यांना प्राथमयक्रम देऊन रोड चे बांधकाम करायला पाहिजे आणि जर ग्रामपंचायतने काम केले नाही तर आपण हिंगणा विधानसभेचे आमदार समीर मेघे यांच्या निधीतून काम देणे आणि नागरिकांचा जाण्यायेण्याचा रस्ता सुस्थितीत करणेबाबत विनंती करू किंवा मग डीपीडीसीकडे श्री. असतकार ते श्रीमती. मथुरे यांच्या यांच्या घरापर्यंत २०० मीटर रस्ता करनेबाबत ग्रामपंचायतचा रीतसर ठराव आल्यास आपणच या रोडबाबत अग्रणी भूमिका घेऊ असे आश्वासन दिले. यावेळी मलिक मॅडम, महेश मेहरकर, पवन लाडसे, आसतकर जी, सचिन वानखेडे, गजभियेजी यांची उपस्थिती होती.

# आमगाव बाजार चौकातील पान सेंटर फोडून १ लाख ८० हजारांची चोरी, आरोपीसह दोन विधी संघर्ष बालक ताब्यात

### सीसीटीव्ही व तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांची कारवाई, चोरीची संपूर्ण रोकड हस्तगत, दुचाकीही जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव शहरातील बाजार चौक परिसरात पान सेंटरचे शटर फोडून तब्बल १ लाख ८० हजार रुपये रोकड लंपास करणाऱ्या टोळीचा आमगाव पोलिसांनी छडा लावला आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी परजिल्ह्यात जाऊन अत्यंत शिताफीने तपास करत एका आरोपीसह दोन विधी संघर्ष बालकांचा सहभाग निष्पन्न केला आहे. आरोपींकडून चोरीची १ लाख ८० हजार रुपयांची संपूर्ण रोकड हस्तगत करण्यात आली असून, एका विधी संघर्ष बालकाकडून चोरीच्या पैशातून खरेदी करण्यात आलेली अंदाजे ५० हजार रुपये किमतीची TVS Jupiter दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

याप्रकरणी आमगाव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ५७७/२०२६, कलम ३०५, ३३१(४) भारतीय न्याय संहिता (इठर) २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रविण राधेश्याम मेंढे (वय ३१), रा. बनगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया यांचे आमगाव बाजार चौक परिसरात पान सेंटरचे दुकान आहे. दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ७.४० वाजता ते २८ ऑगस्ट रोजी पहाटे ५.४८ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर फोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानातील रोकड लंपास केली. यामध्ये पान सेंटरच्या दिवसाच्या व्यवसायातून जमा झालेली सुमारे १४ हजार रुपयांची रक्कम, तसेच घराच्या बांधकामासाठी ठेवलेली १ लाख ६६ हजार रुपयांची रोकड, अशी एकूण १ लाख ८० हजार रुपये रक्कम चोरीला गेली.

शटर तुटल्याचे सकाळी उघड आल्याने फियार्दी यांना त्यांच्या मित्राने फोन करून दुकानाचे शटर तुटलेले असल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी दुकानात जाऊन पाहणी केली असता दुकानातील १ लाख ८० हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दिनांक ३० ऑगस्ट रोजी दुपारी ३.४४ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

ही कारवाई गोंदिया जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदनी चानपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश डाबेराव. पोलीस हवालदार असीम मन्यार , योगेश मुनेश्वर, दुधराम मेश्राम, पोलीस शिपाई चेतन शेंडे, भागवत कोडापे, मिलनसिंग मंजुटे, दिनेश वानखेडे, नितीन चोपकर तसेच आमगाव पोलीस ठाण्यातील इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये २० नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार सोहळा

### लता मंगेशकर नेत्रपेढीतर्फे नेत्रदान जनजागृती पंधरवडा, 'नेत्रदान करा, मरणानंतरही कोणाच्या तरी आयुष्यात प्रकाश आणा'–रुग्णालयातर्फे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नेत्रदानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी एनकेपी साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूरच्या नेत्ररोग विभागांतर्गत लता मंगेशकर आय बँकेतर्फे २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान 'नेत्रदान पंधरवडा' आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांमध्ये नेत्रदानाबाबत जनजागृती करून अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.



त्यानिमित्ताने, मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे महान कार्य करणाऱ्या २० नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान सोहळा लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटर, नागपूरचे अध्यक्ष डॉ. मनीष श्रीगिरीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी लता मंगेशकर हॉस्पिटलचे उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे, रुग्णालयाचे नेत्र प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. अजय कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार विकास वैद्य, नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ. रेखा खंडेलवाल, उपाधीक्षक डॉ. सुश्रुत फुलारे, डॉ. ऋतुजा देव, डॉ. राजू खंडेलवाल, डॉ. दीपा कुमार, दिनेश मंडपे, मनीष विश्वकर्मा आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. मनीष श्रीगिरीवार म्हणाले की, नेत्रदान ही अत्यंत मोठी संकल्पना आहे. मानवतेचा आदर्श समाजासमोर निर्माण करून नेत्रदात्यांनी एक नवा संदेश दिला आहे. आपल्या जवळच्या व्यक्तीच्या निधनाच्या दुःखद क्षणी नेत्रदानाचा निर्णय घेणे ही खरोखरच मोठी गोष्ट आहे. एका नेत्रदानामुळे गरजू व्यक्तीला दृष्टी मिळू शकते. त्यामुळे नेत्रदानाची चळवळ घराघरात पोहोचविण्याची गरज आहे.

शरीराचा कोणताही अवयव असो, अवयवदानाच्या चळवळीत महिलांचा सहभाग उल्लेखनीय असून, शरीराचा कोणताही अवयव असो, अवयवदानात महिला आघाडीवर आहेत. अवयवदान व नेत्रदानाविषयी समाजात सातत्याने चर्चा झाली पाहिजे. त्यातून अवयवदानाबाबत जनजागृती वाढून अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते.

डॉ. नितीन देवस्थळे म्हणाले की, कॉर्निया डोनेशन अर्थात नेत्रदानाचा निर्णय घेणे ही खूप मोठी गोष्ट आहे. लता मंगेशकर नेत्रपेढीच्या माध्यमातून एका वर्षात ४० नेत्रदान आणि २० प्रत्यारोपण करणे हे अत्यंत उल्लेखनीय कार्य आहे. या कार्यात योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन. नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणखी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होणे आवश्यक आहे. नेत्रदान करणाऱ्या दात्यांच्या कुटुंबीयांचा यावेळी कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनानंतरही त्यांचे डोळे दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात, हा मानवतेचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

नेत्रदानाबाबत समाजात अनेक गैरसमज आहेत. प्रत्यक्षात नेत्रदानासाठी संपूर्ण डोळा काढला जात नाही; दृष्टी पुनर्स्थापनेसाठी प्रामुख्याने कॉर्निया उपयोगात आणला जातो.

मृत्यूनंतर शक्य तितक्या लवकर नेत्रदानाची प्रक्रिया करणे महत्त्वाचे असते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी नेत्रदानाची इच्छा व्यक्त करून त्याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. 'तुमचे डोळे तुम्ही गेल्यानंतरही कोणाला तरी दृष्टी देऊ शकतात. नेत्रदानाचा संकल्प करा आणि अंधारमय जीवनात प्रकाशाची किरणे पोहोचवा, असे आवाहन लता मंगेशकर हॉस्पिटलच्या नेत्ररोग विभागप्रमुख डॉ रेखा खंडेलवाल यांनी केले.

'नेत्रदान करा, मरणानंतरही कोणाच्या तरी आयुष्यात प्रकाश आणा', असे आवाहन लता मंगेशकर नेत्रपेढीतर्फे यावेळी करण्यात आले. लता मंगेशकर हॉस्पिटलच्या नेत्ररोग विभागाचे सर्व डॉक्टर्स, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## रामटेकमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने घरोघरी सायंकाळी श्रीकृष्णाची मूर्ती स्थापन केली. पूजा-अर्चा, भजन, हवन आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी श्रीकृष्णाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात येणार आहे. रामटेक शहरातील कुंभार समाजातील सुमारे ४० परिवार दरवर्षी श्रीकृष्णाच्या मातीच्या मूर्ती तयार करण्याचे काम करतात. मूर्ती तयार करण्यासाठी लागणारी माती काटोलजवळील सावरगाव , आंधळगाव, घोघरा आदी परिसरातून आणली जाते. कुंभार समाजातील कारागिरांच्या माहितीनुसार, यंदा रामटेक शहरात सुमारे तीन हजार श्रीकृष्णाच्या मातीच्या मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. आगस्ती आश्रम गडमंदिर येथे भक्त द्वारा श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरा करण्यात आला. मूर्तींची किंमत आकारमान व कलाकुसरीनुसार ५०० ते १ हजार रुपयांपर्यंत आहे. रामटेक शहरासह तालुक्यातील ग्रामीण भाग, कामठी आणि नागपूर येथे या मूर्तींची विक्री करण्यात आली. श्रीकृष्ण जन्माष्टमी हा हिंदू धमार्तील अत्यंत श्रद्धेचा आणि धार्मिक महत्त्वाचा उत्सव असून, भक्तांनी मोठ्या आस्थेने हा उत्सव साजरा केला.

## हडस हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यासाठी वारली कला कार्यशाळा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूरने सीबीएसई हदास हायस्कूल, नागपूर येथे वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेचा लाभ सुमारे ८० विद्यार्थ्यांना झाला. क्लब सदस्या नेहा मुंजे यांनी कार्यशाळा घेतली आणि विद्यार्थ्यांना वारली कलेचा इतिहास व तिचे पारंपरिक महत्त्व समजावून सांगितले. सोप्या आणि रंजक पद्धतीने प्रात्यक्षिके दाखवत त्यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक वारली आकृत्या व नक्षी काढायला शिकवले.

विद्यार्थ्यांनी खूप उत्साहाने सहभाग घेत स्वतःची वारली चित्रे तयार केली. तरुण कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट चित्रांसाठी पाच बक्षिसे देण्यात आली. ही बक्षिसे क्लबच्या सल्लागार पीपी डॉ. भाग्यलक्ष्मी राजन यांनी प्रायोजित केली. क्लब अध्यक्षा पूजा सावजी यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले आणि कार्यशाळा घेण्यासाठी नेहा मुंजे यांनी केलेल्या प्रयत्नांचेही अभिनंदन केले. हदास हायस्कूलच्या शिक्षकांनीही मोलाचे सहकार्य केले.

या उपक्रमाचे नेतृत्व प्रकल्प संचालक योगिता देशमुख यांनी केले. यावेळी अनेक क्लब सदस्य उपस्थित होते. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक भारतीय लोककलेबद्दल जाणून घेण्याची आणि तिचे सौंदर्य अनुभवण्याची छान संधी मिळाली.

# शिक्षण संस्थांच्या प्रश्नांवर ६ सप्टेंबरला महामंडळाचे अधिवेशन

### खासदार सुप्रिया सुळे यांची प्रमुख उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या वतीने नागपूर व अमरावती विभागातील शिक्षण संस्थांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त अधिवेशन रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत महामंडळाचे सहकार्यवाह रविंद्र फडणवीस यांनी दिली.

या अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या अध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते होणार आहे. अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष पदी आमदार अभिजीत वंजारी, तर कार्याध्यक्षपदी महामंडळाचे माजी केंद्रीय मंत्री विजयनवल पाटील आहेत. शिक्षक आमदार सुधाकर अडबले, शिक्षक आमदार किरण सरनाईक, आमदार संजय भेंडे, आमदार धीरज लिंगाडे तसेच महामंडळाचे सहकार्यवाह रविंद्र फडणवीस, विजय गव्हाणे, नागपूर विभागाचे अध्यक्ष अनिल शिंदे, अमरावती विभागाच्या अध्यक्षा कांचनमाला गावंडे यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. नागपूर व अमरावती विभागातील शिक्षण संस्थांचे संचालक मोठ्या संख्येने अधिवेशनात सहभागी होणार आहेत.

दुपारी १२ वाजता एमकेसीएलचे संचालक शशिकांत देशपांडे यांचा एआय वर सेमीनार होणार असून दुपारी २ वाजता किरण भगत व रविंद्र कापसे यांचे सत्र होईल. खुल्या सत्रानंतर दुपारी ४ वाजता अधिवेशनाचा समारोप हाईल.

शालेय व उच्च शिक्षण क्षेत्रासंदर्भात शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या विविध निर्णयांमुळे शिक्षण संस्थांवर आर्थिक व प्रशासकीय अडचणी वाढत आहेत. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत असल्याने शिक्षण व्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होत असून, शिक्षण क्षेत्रासमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः शून्य शिक्षकी शाळांची वाढती संख्या, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये होणारी घट आणि ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर त्याचा होणारा परिणाम या मुद्द्यांवर अधिवेशनात सविस्तर चर्चा केली जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी शिक्षकांची संख्या कमी करण्याच्या धोरणामुळे ग्रामीण शिक्षणाचा पाया कमकुवत होत आहे.

या आणि अशा अनेक विषयांवर अधिवेशनात विचारमंथन होणार आहे. शिक्षण संस्थांच्या विविध प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आयोजित या अधिवेशनाला संबंधितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाच्या कार्यकारिणीने केले आहे.


पत्रकार परिषदेला नागपूर विभागीय सचिव किशोर मासुरकर, महेश चामट, कमला नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप बडवाईक यांची उपस्थिती होती.

## नातेवाईक नसलेल्या चौकीदारावर संस्थेने केले अंत्यसंस्कार, सामाजिक बांधिलकीचे दर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

श्री समर्थ शिक्षण मंडळ, रामटेकच्या आझाद वॉर्ड परिसरातील माध्यमिक, प्राथमिक, कॉन्व्हेंट शाळा तसेच क्रीडा संकुलात चौकीदार म्हणून कार्यरत असलेले शंकरनाथ फकिरनाथ वाघ (८५) यांचे १ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

वाघ यांचे सांभाळ करणारे किंवा जवळचे नातेवाईक कोणीही नसल्याने त्यांच्या निधनानंतर अंत्यसंस्काराचा प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितीत श्री समर्थ शिक्षण मंडळाच्या पदाधिकारी व कर्मचारीवगार्ने सामाजिक



बांधिलकी जपत पुढाकार घेत त्यांच्या अंत्यसंस्काराची जबाबदारी स्वीकारली.

वाघ यांच्या निधनाची माहिती पोलिसांना लेखी स्वरूपात देण्यात आली. त्यानंतर शासकीय रुग्णालयात नियमानुसार शवविच्छेदन करण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले.

वाघ यांनी संस्थेच्या विविध शैक्षणिक विभाग व क्रीडा संकुलाच्या सुरक्षेसाठी दीर्घकाळ सेवा बजावली होती. त्यांच्या निधनाने संस्थेतील कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. यावेळी संस्थेच्या सर्व विभागांच्या वतीने मृतात्म्यास श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. संस्थेने दाखविलेल्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.